# यात्रा-मार्ग-दर्शन

(भारतांतील यात्रांची त्रोटक माहिती)

१९५३
म. ग्रं. मं. ठाणे
विषय भू. प्रवास
सं. नं. १८८



– लेखक –

**कृष्णाजी जिवाजी मोघे,**
पेन्शनर पोष्टमास्तर, शहापूर-बेळगांव.

REFBK-0008140
REFBK-0008140

सन १९५३

मूल्य १२ आणे

# यात्रा-मार्ग-दर्शन

(भारतांतील यात्रांची त्रोटक माहिती)

प्र.प्र. २१-९८८

– लेखक –

**कृष्णाजी जिवाजी मो[illegible]**

शहापूर-बेळगांव.

REFBK-0008140

REFBK-0008140

मराठी ग्रंथ संग्रहालय

ग्रा. क्र. ८१८०

सन १९५२

मूल्य १२ आणे

— प्रकाशक —

कृष्णाजी जिवाजी मोघे,

पेन्शनर पोष्टमास्तर,

मोतीबाग चाळ नं. १, खोली नं. ४,

मुंबई-आग्रा रोड, ठाणें.

—: सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन :—

प्रथमावृत्ति १९५३

— मुद्रक —

वासुदेव धोंडो गुर्जर,

श्री मुद्रणालय,

रामदेव गल्ली, बेळगांव.

## माझे दोन शब्द—

मी पेन्शन घेतल्यानंतर ३-४ वर्षें मधूनमधून पुण्यतिथि-उत्सव वगैरे करीत हिंडत असे. नवबाग ( कागवाड ), गोंदवलें, गुर्लहोसूर, तुळजापूर, गाणगापूर, पंढरपूर वगैरे केलीं होतीं; पण आमचे एक मित्र श्री. रामभाऊ जोशी यांनीं काशी-यात्रेचा बेत केला. मीही जाणार होतों. महायुद्धामुळें सर्व रेल्वे-सवलती बंद होत्या. गाड्या कमी झालेल्या व योग्य माहिती सांगणारा एकही वाटाड्या नाहीं. पुढें एका गृहस्थाकडून श्रीगौरी-शंकर-कंपनीच्या गाडीबद्दल माहिती कळतांच मी रिझर्वेशन-फी पाठवून नांव नोंदविलें. जेवणासुद्धा २०० रुपये देऊन कशीतरी डब्यांत बसून यात्रा संपविली.

डब्यांतून यात्रा करण्यांत बऱ्याच गैरसोयी अनुभविल्या. थोडीशी जागा, भांडणें, मालकाचा यात्रेकरू भरण्याचा सपाटा, वेळींअवेळीं मिळाल्यास जेवण, मिळेल त्या जागेंत झोंपणें—जेवणें व प्रत्येक क्षेत्रांत गाडी चुकूं नये, यासाठीं विधी अगर स्थळें वगैरे पाहणें राहूनच जाई. कधीं कधीं उघड्या प्लॅटफॉर्मवर निजणें व कोठेंतरी जेवणें करावीं लागत. शिवाय स्टेशनापासून गांवांत अगर इतर ठिकाणांसाठीं वाहनें ठरविणें, माहिती मिळविणें फारच कठीण पडे. ( हल्ली हें कांहीं कंपन्या सगळें करतात, असें जाहिरातींतून वाचतों.) आजारीपणांत तर सर्वच हाल. अशा प्रसंगांना तोंड द्यावें लागतें. तेव्हां सोबतीनें पण स्वतंत्रपणें जावें, हेंच बरें, असें ठरवून मी पुढील सर्व यात्रा तशा प्रकारें केल्या.

प्रवाशानें सहज आपणांस नेतां येईल, असा बोजा घ्यावा.

त्यांत तांब्या, भांडें, लहान पातेलीं व २-३ भांडीं घ्यावीं. सोवळें-ओवळें ज्याचेत्याचे मर्जीवर. एक कांबळें, शाल, मोजे जरूर घ्यावेत. जुनी जोडा-चप्पल वापरावी. अलाहाबादपासूनच थंडी जाणवते. दिल्ली, आग्रा वगैरे ठिकाणीं ती फारच जाणवते. छत्री ~~अगर काठीची~~ जरूर नाहीं.

हल्लीची गाडींतील गर्दी, हमालांचा त्रास वगैरे अडचणींची दखल घ्यावी. पैसे वगैरे सुरक्षित रीतीनें ठेवीत असावें. गाड्यां-संबंधीं वगैरे व काय पहावें, कसें जावें, यांसंबंधीं माहिती साधार योग्य मिळविण्यास मला जे कष्ट पडले, ते न पडतां सर्वांना सोई-स्कर रीतीनें यात्रा घडाव्यात, म्हणून अगदीं (अल्प किंमत ठेऊन) त्रोटक माहितीनें बारा ज्योतिर्लिंगें व चार धामांच्या यात्रा कर-णाऱ्यांच्या मार्गदर्शनासाठीं मी हें पुस्तक छापविलें आहे. त्याचा आवश्यकतेनुसार सर्व बंधु-भगिनींनीं उपयोग करून घ्यावा, अशी विनंती आहे.


महाराष्ट्रीय यात्रेकरू बंधु-भगिनींना माझ्या या पुस्तकाचा प्रवासाच्या कामीं थोडाबहुत जरी उपयोग झाला, तरी माझ्या श्रमाचें योग्य चीज झाल्याचा मला आनंद होईल.

—लेखक.

---

## — अनुक्रमणिका —


| क्रमांक | यात्रेचें नांव | पृष्ठांक | क्रमांक | यात्रेचें नांव | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | त्रिस्थळी यात्रा | १ | ६ | सौराष्ट्रांतील यात्रा | ३० |
| २ | रामेश्वर यात्रा | ७ | ७ | श्रीमल्लिकार्जुन यात्रा | ३५ |
| ३ | भिमाशंकर | २२ | ८ | केदारनाथ | ४० |
| ४ | अलाहाबाद | २४ | | बद्रिनारायण | ४७ |
| ५ | औदुंबर व इतर यात्रा | २६ | ९ | जगन्नाथपुरी | ५६ |



— लेखक —

श्री. कृष्णाजी जिवाजी मोघे.

कृ-प्र-९८८
रथान ...

# यात्रा-मार्ग-दर्शन

( माझ्या तीर्थयात्रेचीं मार्गदर्शक टिप्पणें )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८९४०
दा. नं. ..........

## त्रिस्थळी-यात्रा

नोव्हेंबर १९४७ सालीं मी काशी-यात्रेस जाण्याचें मनांत आणलें, व बऱ्याच तपासानंतर हुबळीहून ' श्रीगौरी शंकर - यात्रा कंपनी'चे डब्यांतून बेळगांवांतलेच आमच्या शेजारचे एक पेन्शनर व्हॅक्सिनेटर श्री. रंगोपंत नाईक यांच्यासह बेळगांवहून तारीख २५-२-४८ रोजीं दुपारीं ११ वाजतां कंपनीच्या डब्यांतून रेल्वेनें पुणें येथें जाण्यासाठीं निघालों. आमच्या जागा ( सीट्स् ) राखून (रिझर्व्ह) ठेवल्या होत्या. तरी विजापूर, कारवार, म्हैसूर वगैरे भागांतील लोकांच्या गर्दीत बसावें लागलें. रात्रीं पुण्यास पोहोंचलों. सकाळीं धर्मशाळेंत गेलों. नंतर भीमाशंकरला जाणाऱ्या मोटारीचा तपास केला. मोटार आल्यावर बरेच लोक निघाले. मला एक जागा देऊं केली होती. पण आणखी २-३ इसमांची सोय नसल्यानें मी गेलों नाहीं. पुण्याहूनसुद्धां यात्रेला बरीच मंडळी आली होती. स्नानें, जेवणें आटोपून गांवांत पाहुणे मंडळींना भेटून आलों. गौरीशंकर कंपनीचे डॉक्टर, जोशी मास्तर, १-२ स्त्रिया अशी आम्ही मराठी बोलणारी मंडळी एका ग्रूपमध्यें जमलों.' आजऱ्याचें चिमणेकरांचें एक कुटुंब,

विजापूरचें एक कुटुंब असे आम्ही जवळजवळ बसत असूं. बाकी लिंगायत व इतरेजन अशी सुमारें सर्व १२५ पर्यंत मंडळी होती. कोमटयांचें एक कुटुंब जेवणासाठीं ब्राम्हणांकडे येई. आम्हीं सर्व-जण एका मोठ्या जी. आय्. पी. च्या बोगींत चढलों व मुंबईस आलों.

## मुंबई

धर्मशाळेंत अगर प्लॅटफॉर्मवर, मिळेल तेथें रहावयाचें, पाण्याची सोय पाहून आंघोळ, घालतील तें जेवण (स्वयंपाकी एक ब्राम्हण होता व लिंगायतांना त्या जातीच्या बाया होत्या).मुंबईस समुद्रस्नान केलें. राणीचा बाग, म्यूझियम् वगैरे पाहणाऱ्यांनीं पाहिलीं. मी बऱ्याच वेळां पूर्वी आलेला असल्यानें कांहींही पहा-ण्यास गेलों नाहीं. ता. १-३-४८ ला मुंबईहून निघून रात्रीं नाशिक-ला पोहोंचलों.

## नाशिक-त्र्यंबकेश्वर

सकाळीं मोटारनें नाशिक गांवांत गेलों आणि गाडगे महा-राजांच्या धर्मशाळेंत उतरलों. (वाटेंत यात्रेकरूंकडून कर वसूल करतात.) आम्हांस तीर्थविधी करावयाचा, म्हणून कोणाकडे जावें, याचा विचार करीत होतों. इतक्यांत दीक्षित आडनांवाचे उपाध्ये भेटले. त्यांनीं आग्रह करून संभावना वगैरे ठरवून आम्हांस घरीं नेलें. गोदेचें स्नान, क्षौर, श्राद्ध, तर्पण, पिंड व जेवणें आटोपून स्टँडवर आलों व मोटारीनें त्र्यंबकेश्वरास गेलों. सबंध मोटार (लहान प्रवास म्हणून) जातांयेतां ठरविली होती. पुष्करणीवर मार्जन करून श्रीचें दर्शन घेतलें. रात्रीचे नऊ वाजले होते. इतर कांहीं ( गोदेचा उगम, नील पर्वत वगैरे ) पाहिलें नाहीं. रात्रीं धर्मशाळेच्या बागेंत निजलों. सकाळीं (३-३-४८) स्नानें करून

पंचवटी, गुंफा, लक्ष्मणरेषा वगैरे पाहून धर्मशाळेंत जेवणें करून स्टेशनकडे निघालों. खानापूरचा निटूर कल्लापा आमच्याबरोबर होता, त्याची आम्हांला फार मदत होई.

गाडी संध्याकाळीं पांच वाजतां पुढें निघाली व इटारसीस मुक्काम करून ता. ५-३-४८ ला पहाटे १-३५ चे सुमाराला आम्हीं जबलपूरला पोहोंचलों. सकाळीं नर्मदास्नान फक्त घडलें. रात्रींच पुढें जावयाचें असल्यामुळें कँपकडील देऊळ, नावेंतून जाऊन मार्बल रॉक्स पाहणें या गोष्टी घडल्या नाहींत. रात्रीं १० वाजतां पुढें निघालों.

## अलाहाबाद ( प्रयाग )

ता. ६-३-४८ ला सकाळीं पांचला अलाहाबाद स्टेशनवर आलों. टांगे, झटके करून गांवांत गेलों. डॉक्टर (संन्यासी) यांनीं आम्हांस पैठणकर उमाकांत यांचेकडे दारागंज येथें नेलें. उपोषण, क्षौर वगैरे यथासांग करविलें. संगमावर ( गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या ) स्नानें करून गांव पाहिला. निजलेला भव्य मारुती व किल्ल्यांतील वटवृक्ष वगैरे पाहून पं. नेहरूंचें ' आनंद-भवन ' हि पाहून घेतलें व ७-३-४८ ला काशीस जाण्यासाठीं मोगलसराई स्टेशनवर रात्रीं आलों. ता. ८-३-४८ ला पहाटें ४-५ वाजतां काशीला पोहोंचलों.

## काशी ( बनारस )

सकाळीं टांगे करून आम्हीं सगळे जंगमवाडींत पोहोंचलों. सामान ठेऊन गयेचे उपाध्ये मराठे प्रयागास भेटले होते, त्यांच्या भावाबरोबर काळभैरवाकडे निघालों. भास्कर कृष्ण शिधोरे यांचे घरीं मराठे यांनींच सर्व तीर्थविधि करविला. शिधोरे घरीं नव्हते. गंगास्नान व सर्व यात्राविधि, शिवरात्रीस श्रीविश्वेश्वर-दर्शन,

काळभैरव-भेट व मोटारींतून पंचक्रोशी करून व्यास-काशी वगैरे पाहून व श्रीकऊबाईचें दर्शन घेऊन काशीहून जंगमवाडींतील लोकांबरोबर ता. १४-३-४८ ला पुनः मोगलसराईवरून पहाटे गयेला आलों.

## गया-अयोध्या-लखनौ

सकाळींच उपाध्ये काशीनाथ महादेव मराठे भेटले. आम्हीं टांगे करून गांवांत गेलों. सर्व क्षेत्र-तीर्थ-विधि, फल्गुस्नान, विष्णुपदावर पिंडदान, पंड्यांचा आशीर्वाद, वटश्राद्ध सगळें मनाजोगें झालें. नाशिकचाच नंबर कडेचा लागला. ता. १७-३-४८ ला गया सोडली व मोगलसराईवरून अयोध्येला आलों. शरयूस्नान, गढीहनुमान व काले रामजींचें दर्शन घेऊन अयोध्या सोडली व लखनौला आलों. देवधर्म वगैरे नसल्यानें शिकारखाना, म्यूझियम् वगैरे पाहून पुढें बरेली, लाखसरवरून ता. २२-३-४८ ला हरिद्वारला आलों.

## हरिद्वार

पवित्र गंगास्नान, ब्रम्हकुंडस्नान, गंगादर्शन व घरीं नेण्यासाठीं गंगा घेणें इत्यादि करून संध्याकाळीं टांग्यानें कनखल तीर्थ व देवस्थानें पाहून परतलों. दुसऱ्या दिवशीं हृषीकेशला रेल्वेनें गेलों. गंगाकांठीं पांडवांचें देऊळ, झुलता पूल पाहून गंगापार जाऊन कांहीं आश्रम, स्वर्गाश्रम वगैरेकडून देवदर्शनें करीत नावेनें गंगा ओलांडून पुनः मोटारींतून स्टेशनवर आलों व हरीच्या पायरीचा आश्रय घेतला (२४-३-४८).

## दिल्ली

ता. २५-३-४८ रोजीं सकाळींच निघून सहरणपूरवरून दिल्लीला आलों. स्टेशनजवळ धर्मशाळेंतच उतरलों. स्नानें, जेवणें

करून तीन दिवसांत काँग्रेस हाऊस, जंतर-मंतर, बिर्ला-मंदिर, राजघाटावरील गांधीजींच्या समाधीचें दर्शन, कौन्सिल हॉल, सुप्रसिद्ध लाल किल्ला व मोटारनें कुतुबमिनार वगैरे पाहून घेतलें. बिर्ला-मंदिर फारच प्रेक्षणीय आहे. (यमुनेचें स्नान रोज होई.)

## मथुरा

ता. २८-३-४८ ला मथुरेला आलों. टांग्यानें गांवांत गेलों. यमुनेवर स्नान करून श्रीराधाकृष्णाचें मंदिर पाहिलें. दार बंद होतें. १२ चे सुमारास पडदा निघाला, दर्शन झालें. मूर्ति व देऊळ चांगलींच आहेत. तेथें प्रसाद विकतात, तो घेऊन माध्यान्ह भागविली व टांगा करून वृंदावनाला गेलों. रात्रीं परत स्टेशनवर जाऊन झोंपलों. गोकुळ पाहण्यास गाडीला सवड नव्हती. मथुरेच्या एका बाजूला गोकुळ व दुसऱ्या बाजस वृंदावन आहे. वृंदावनांत असंख्य देवळें आहेत. जरूर तेवढें पहावें.

## आग्रा–ग्वाल्हेर–भोपाळ

ता. ३०-३-४८ ला आग्रा येथें आलों. प्रसिद्ध ताजमहाल व इतर मशिदी, बागा वगैरे पाहून ता. ३१ ला ग्वाल्हेरला आलों.

महाराष्ट्र-निवासांत भोजन घेतलें, गांव पाहिला, कोणी भांडीं वगैरे घेतलीं. किल्ला दुरून पाहून परत स्टेशनवर आलों.

ता. १-४-४८ ला भोपाळ स्टेशनवर आलों. गांवांत कॉलरा होता, म्हणून कोणीहि गेलों नाहीं. झांशीला मुक्काम ठेविल्याबद्दल कुरकुरत गाडी रात्रीं निघेपर्यंत बसून राहिलों. ता. २ ला भोपाळहून रात्रीं निघून उज्जयिनीला पहाटे ( ता. ३-४-४८ ) पोहोंचलों.

## उज्जयिनी

सकाळीं टांगा करून क्षिप्रा नदीवर स्नान केलें व घाट

चढून जोशी नांवाच्या उपाध्याकडे चहा घेतला व श्रीमहांकाळेश्वराचे अभिषेकासाठीं पैसे देऊन गोत्र सांगून दर्शनाला निघालों. प्रथमच सुमारें १५ फूट उंचीच्या उजव्या सोंडेच्या गणपतीचें दर्शन घेतलें व नंतर पुढें येऊन श्रीमहांकाळेश्वराचें समाधान देणारें दर्शन घेतलें. लिंगाखालीं भुयारासारख्या जागेंत १५-२० पायऱ्या उतरून जाऊन पहावयाचें. वरील दुसऱ्या पायऱ्या चढून गेल्यावर समोर दिसणारें लहान आकाराचें लिंग मुख्य नाहीं. गांव पाहून पुनः संध्याकाळीं परत जोशी मास्तरांसाठीं जाऊन दर्शन घेतलें.

## ओंकार-अमलेश्वर

उज्जयिनीहून परत भोपाळवरून खांडव्याला आलों व ता. ५ रोजीं मोरटक्का स्टेशनवर दुसऱ्या रेल्वेनें ( बी. बी. सी. आय्. लहान लाईन ) आलों. मोटारीच्या तीन खेपा करतांना ओंकार-अमलेश्वरला दिवस मावळतांना पोहोंचलों. नावेंतून नर्मदा ओलांडून स्नान करून घाटाच्या व देवळाच्या पायऱ्या चढउतर करून गडबडीनें दर्शनें घेऊन पुनः नर्मदा ओलांडून आलों. रात्रीं नाव घालीत नसतात. मोटार एकच होती. तींतूनच दोन खेपांत पंढरपूरच्या यात्रेकरूंसारखे उभेआडवे ओणवे राहून स्टेशनवर आलों. आमचेसाठीं थोडें शिळें अन्न राखून ठेवलें होतें. त्यांतील थोडें खाऊन (कारण २४ पेक्षां अधिक तास आम्हीं उपाशी होतों.) परत गाडींत येऊन बसलों व खांडव्याला रात्रीं येऊन आमचे डब्यांत झोंपलों.

चाळीसगांव स्टेशनवरील मुक्कामांत संध्याकाळीं यात्रासमारोप, यात्रेकरूंचा फोटो, मालकाचें भाषण, आभारप्रदर्शन होऊन कांहीं यात्रेकरू मनमाडवरून पंढरपूरकडे व कांहीं पुणेंमार्गें ९-४-४८ ला हुबळीकडे परतले.

—★—

* ३०८६८
२०।१०।५८ *



# रामेश्वर-यात्रा

तारीख २२-८-१९४८ रोजीं सकाळीं ९ वाजतां ( मी, पुण्याचे जोशी मास्तर, रंगाण्णा नाईक व गडहिंग्लजचे दत्तात्रय धोंडो ऊर्फ भाऊराव कुलकर्णी असे चौघे ) श्रीरामेश्वर-यात्रेला मेलनें निघालों. बेळगांवहून हरिहरचीं तिकिटें काढलीं.

## हरिहर

हरिहर स्टेशनहून हरिहर देवस्थान ३-४ फर्लांग आहे. तेथेंच तुंगभद्रेचे कांठीं असलेल्या धर्मशाळेंत एक खोली घेतली व राहिलों (तीन दिवसपर्यंत खोलीला भाडें नव्हतें.)या खेपेस आम्हीं स्वयं-पाकाची तयारी ठेविली होती. २३-८-४८ ला श्रावण सोमवार होता. श्रीहरिहराला अभिषेक करविला. हरि-हराची मूर्ति एकांतच कल्पिलेली आहे. त्रिशूलधारी बाजूला 'हर' व शंखचक्र हातांत असलेल्या बाजूला 'हरि' म्हणून हरिहर. सोमवारीं रात्रीं पालखी निघते. दिवसांही सवाद्य पालखींतून आसपासचे देव हरिहराचे भेटीस आलेले दिसले. देवळाच्या प्राकारांतच अष्टभुजा अंबा-बाईचें देऊळ आहे.

## बेंगळूर

मंगळवार ता. २४-८-४८ रोजीं सकाळींच जेवणें आटोपून ९-१५ चे गाडीनें बेंगळूरास निघालों व रात्रीं ९-२० वाजतां

बेंगळूर स्टेशनवर पोहोंचलों. हमाल करून जवळच असलेल्या तोटाप्पाच्या धर्मशाळेंत गेलों. तेथें हैदराबादच्या रझाकारांच्या भीतीनें आलेल्या निर्वासितांनीं सर्व जागा अडविली होती. रखवालदारास खूष करून माडीवर आडवे होण्याइतकी जागा मिळविली. भाऊराव स्टेशनवर चुकले होते, त्यांना शोधून आणलें. ता. २५ ला सकाळींच गाडी करून गांवांत शास्त्री हॉटेलमध्यें २४ तासांना पांच रुपये भाडें ठरवून एक खोली घेतली. फक्त स्नान फुकट होतें. जेवणांत भात, भाजी, सार, ताक मिळालें. जेवणासाठीं वेगळा चार्ज देऊन तिकिट काढावें लागतें. जेवणें त्याच खाणावळींत केलीं व विश्रांती घेऊन गांव पाहणेस गेलों.

चिक पेठेंतून सिटी मार्केटपर्यंत चालत गेलों. नंतर गांधी मार्केटपर्यंत (बसवणगुडी) झटका केला. बसवणगुडींत बसवण्णा (नंदी) व मारुती यांच्या भव्य मूर्ति पाहून लालबाग पाहण्यास बसमधून गेलों (फारसें पाहण्याजोगें बागेंत कांहीं नाहीं.) झटका करून सिटी मार्केटांत परत आलों. वाटेंत जोराचा पाऊस झाला. त्या गर्दींत रंगाण्णाचा खिसा चांचपणारे मुसलमान भेटले. बुधवार म्हणून म्यूझियम् बंद असल्यानें परत हॉटेलांत येऊन फराळ करून रात्रीं झोपलों. ता. २६ ला सकाळींच स्नानें-जेवणें हॉटेलांत करून व झटका करून म्हैसूरला जाण्यासाठीं निघालों. गांवांत हॉटेलजवळच तिकिट-ऑफिस होतें. तिकिटें घेऊन स्टेशनवर येऊन ११ वाजतांचे गाडीनें निघालों.

## श्रीरंगपट्टण

म्हैसूरच्या अलीकडे ४–५ स्टेशनें श्रीरंगपट्टण आहे. पुनः परतण्याचें टाळून तेथेंच उतरलों व कॉरोनेशन बिल्डिंगमध्यें २४ तासांना १५ आणे भाडें देऊन एका खोलींत राहिलों ( स्टेशन-

वरून एक-दीड फर्लांग.) जवळच श्रीरंगाचें देऊळ आहे. ता. २७ ला सकाळीं कावेरीचें स्नान करून देव-दर्शन घेऊन आलों. ही कृष्ण-पाषाण-मूर्ति निजलेली आहे. सकाळीं ९ ते १२ व सायंकाळीं ५ नंतर दर्शन होतें. आज गोकुळाष्टमी होती. संध्याकाळीं चारचे गाडीनें पुनः म्हैसुरास निघालों. (सकाळींच किल्ला व कावेरी दोहोंकडून वाहते, असा आरसेमहाल (दर्यादौलत) वगैरे पाहून घेतलीं होतीं.)

## म्हैसूर

म्हैसूर स्टेशनपासून सुमारें १ फर्लांगावर मॉडर्न हॉटेल आहे. तेथें खोली-भाडें रोज ५ रुपये व जेवण-चार्ज १। रुपया पडतो, असें समजल्यानें पलीकडेच असलेल्या नन्दराज बहाद्दूर यांचे छत्रांत ( धर्मशाळा ) रोज १।। रु. भाडयाची माडीवरील खोली घेतली.

ता. २८ रोजीं सकाळीं नळाचे पाण्यानें स्नानें वगैरे करून मार्केटच्या बाजूस ' वडे गोविंदराव ' यांचे खानावळींत जेवलों. मार्केट बघून टांगा करून राजवाडा पाहणेस गेलों (राजवाडा मार्केटजवळच आहे.) परंतु कोणालाही आंत जाण्यास परवानगी बंद केली असल्यानें श्री चामुंडेश्वरीचें दर्शन घेण्यास निघालों.

## चामुंडेश्वरी

या टेकडीवर चढण्यास ७००-८०० पायऱ्या आहेत. मी वर जाऊन अगोदर दर्शन घेतलें. बारा वाजतां दरवाजा बंद होतो. पुनः बाहेर येऊन इतरांना गडबड केली व त्यांनाही दर्शन झालें. वाटेंत एक मोठा नंदी आहे. ईश्वरीचें देऊळ भव्य आकाराचें असून देवीची मूर्ति साधारण दोन फूट उंचीची असावी. ( इकडे सर्वच देव काळ्या पाषाणाचे असून मूर्ति मोठमोठ्या आहेत. ) आम्ही तीर्थप्रसाद घेऊन बाहेर आल्यावर पडदा घातला गेला.

खालीं उतरून आलों तों पावणेदोन वाजले होते. टांगेवाला फारच गडबड करीत होता. पण सर्वच म्हातारे थकले होते. टांगा झू गार्डनकडे नेला; परंतु तीन वाजून गेले असल्यानें गार्डन बंद झाली होती, म्हणून तसेच मार्केटपर्यंत येऊन घरीं परतलों व ६-२५ चे गाडीनें कन्नंबाडी स्टेशनला कृष्णराज-सागराची शोभा पाहण्यास गेलों ( अरसिकेरी लाईनवर तिसरें स्टेशन.)

## कृष्णराज–सागर

तेथील धरण व देखावा फारच आनंददायी आहे. फक्त शुक्रवारीं व शनिवारीं रात्रीं निरनिराळ्या रंगांचे प्रकाशझोत पाण्यावर व आंत टाकतात ( पाण्याचे ओघही निरनिराळ्या तऱ्हेचे.)याचा फारच मनोहर देखावा दिसतो.परत म्हैसुरास रेल्वेनें रात्रीं ९-३० ला आलों.

## झू गार्डन

ता. २९ ला झू गार्डन पाहणेस गेलों. गेंडे, गवे रेडे, रान-गाई, कोल्हे, मोर, पाण-हत्ती वगैरे बरेच प्राणी आहेत. पांढरे मोरहि आहेत. लखनौ येथेंही आम्हीं ते पाहिले होते. परत येऊन जेवणें आटोपून विश्रांती घेतली. इकडे केळीचीं पानें फक्त श्राद्ध-दिनीं जेवणांत उभीं घेतात; एरवीं आडवींच घ्यावीं लागतात.

## नंजनगुड

ता. ३० ला सकाळीं नंजनगुड येथें जाण्यासाठीं स्टेशनवर आलों व गाडीनें पुढें निघालों. गांव लहानच, पण साधारण बरा आहे. श्री नंजुंडेश्वराचें देवालय सुमारें अर्ध्या मैलावर आहे. देवळाजवळ श्रीशंकरमठ-पाठशाला आहे, तेथेंच उतरलों.

जवळच कपिला नदी वाहते. स्नान वगैरे आटोपून देव-दर्शन घेतलें. सायंकाळीं सोमवार सोडून दुसरें कांहींच पाहण्याजोगें नव्हतें, म्हणून झोपीं गेलों. देवळाच्या कांपाऊंड-वॉलवर निरनिराळीं गणपतीचीं, शंकराचीं, देवीचीं अशीं चुन्याचीं चित्रें बरींच आहेत. प्राकार, गोपुरें (मजलेवारी) व मोठचा मूर्ति हें इकडील वैशिष्टच आहे. ता. ३१ रोजीं जेवणें करून दुपारीं तीनचे गाडीनें चामराजनगरास गेलों.

## चामराजनगर ते मदुरा

दोन तासांत तेथें गाडी पोंचली. स्टेशनवरून झटका करून चामराज बँकेच्या धर्मशाळेंत उतरलों. ता. १-९-४८ ला सकाळीं जेवणें करून जयमंगला मोटारीनें कोइमतुरास निघालों. वाटेंत म्हैसूर संस्थानची हद्द संपते, तेथून मोटार बदलते. हरिहरपासून चामराजनगरपर्यंत केळीं, नारळ जागोजाग असलेल्या कालवे-तळयांनीं सर्वत्र समृद्धी असावीसें दिसतें. भात, नाचणा, जोंधळा, एरंडी, मिरची वगैरे सर्व तऱ्हेचीं पिकें ( गहूंखेरीज ) दिसतात. डोंगराळ भाग सोडून पड-जमीन दिसलीच नाहीं. जंगल भुरटें दिसलें. येथें सत्यमंगला नांवाची मल्याळी लोकांची देवी आहे. जवळच मोटार-स्टँड आहे व पुढें ४४ मैल कोइमतूर आहे. मोटार बदलून पुनः तिकिटें घेऊन कोइमतुरास संध्याकाळीं आलों. स्टँड-वरून टांगा करून स्टेशनवर आलों व रात्रीं १०-२५ वाजतां कोचीन एक्स्प्रेसनें ता. २-९-४८ ला सकाळीं ६-४५ ला मदुरेला थेट जाणाऱ्या गाडीनें पोहोंचलों व टांगा करून जवळच असलेल्या मारवाडी धर्मशाळेंत माडीवरील खोलींत राहिलों. तेलंगी ब्राम्हणांना जागा देत नसावेत. विहीर, नळ, शौचकूप सर्व व्यवस्था बरी दिसली.

स्नानें आटोपून श्री सुंदरेश्वर व मीनाक्षी यांचीं दर्शनें घेऊन आलों. श्री मीनाक्षीचें देवालय चांगलेंच प्रशस्त असून यथाप्रकार गोपुरें वगैरे आहेत. श्री सुंदरेश्वराचा सोन्याचा कळस पाहण्याजोगा आहे. ता. ३ ला सकाळींच स्नानें आटोपून देवदर्शन करून येऊन जेवणें केलीं व रामेश्वराकडे जाणारी गाडी (दुपारीं चार वाजतां) असल्यानें स्टेशनवर आलों. गाडी ५-१५ ला निघाली. कोईमतूर-पासून या भागांत वाटोळच्या पानाचे ताडाचीं झाडें फार दिसलीं. अंबा, फणस दिसत नाहीं. मन्ना-मदुराई जंक्शनवरून रात्रीं ११ वाजतां रामेश्वरास पोहोंचलों. मन्ना-मदुराईपासून एकबोटे यांचा एजंट आमचे मागें होता. आम्हीं गुर्जर पुजाऱ्याकडे जाणार म्हणून सांगितलें तरी आमचें सामान उतरण्यास लागून एक झटका बोलावून ' रात्र आहे, मी सर्व व्यवस्था करितों, ' म्हणून आम्हांस रामचंद्र एकबोटे पुजाऱ्यांच्या घरींच घेऊन गेला. भाषेची अडचण, परस्थळ वगैरे पाहून आम्हीं तेथेंच राहण्याचें ठरविलें. गांव स्टेशनहून एक मैल असेल. मुख्य देवळाच्या आस-पासच वस्ती आहे.

## रामेश्वर

ता. ४ रोजीं सकाळींच दिनकर पुजारी ( गुर्जर ) भेटले. त्यांचें व एकबोटे यांचें नातें होतें. आम्हींहि आतां दुसरीकडे न जातां एकबोटे यांचेकडूनच सर्व करविण्याचें ठरविलें. श्री रामेश्वरास एकादष्णी करविली. ब्राम्हण बाहेर बसूनच रुद्र म्हणतात. पास काढावा लागतोच. श्राद्ध, गोप्रदानें होय-नव्हे सर्व कांहीं झाल्यावर त्यांना तीस रुपये द्यावयाचे असें ठरविलें व आजच क्षेत्र-उपोषण व लक्ष्मणतीर्थावर क्षौर वगैरे करविलें. येथें बापूभटजी नांवाचे उपाध्ये होते. एक मैलावर लक्ष्मणतीर्थ

आहे. नंतर श्रीरामेश्वराचें दर्शन घेतलें. श्रीरामेश्वर – उजवीकडे श्रीपार्वतीमाता, डावीकडे श्रीकाशीविश्वनाथ व जवळच अन्न-पूर्णा अशीं सर्व मोठ्या देवळांतच आहेत. ता. ५-९-४८ ला सकाळींच रामेश्वर देवळांतील २४ पैकीं २३ तीर्थांवर स्नानें केलीं व दुपारीं श्राद्धें, पिंडदानें वगैरे करून एकबोटे यांचे घरीं जेवलों. रात्रीं नऊ वाजतां ईश्वर शयनगृहांत (कैलास) जाण्याचा सोहाळा पाहिला व खोलीवर परतलों.

## धनुष्कोडी

ता. ६-९-४८ ला सकाळींच सात वाजतां समुद्रमार्गें (रेल्वे आहेच) शिडाच्या होडींतून धनुष्कोडीस गेलों. ४–५ तास लागले. तेथें नंबुद्री ब्राम्हणाला उपाध्येपणासाठीं एकबोटे यांचा मनुष्य पत्र घेऊन आला होता. त्याचेमार्फत दोन्ही समुद्रावर (बंगालचा उप-सागर व अरबी समुद्र) ससंकल्प स्नानें केलीं. वाळूचीं लिंगें करून (समुद्रवाळूवर) सेतू घेऊन आलों. भिकारी व तिकडील ब्राम्हण यात्रेकरूंना फारच गोंधळून सोडतात. चोऱ्याहि होतात. म्हणून दक्षता फार ठेवावी लागते. त्याच बोटींतून एक दोन तासांत रामेश्वरास आलों. भाडें व धर्मादाय ज्याचा त्यानें (किरकोळ) केला. हें ठिकाण अठरा मैल आहे म्हणतात. ( सर्व मक्ता दिला असला तरी प्रत्येक ठिकाणीं पैसे मागतात, फक्त निरनिराळ्या प्रकारें.)

रात्रीं देवळांत एकादष्ण्या करविल्या. (तिकिटें काढून) सोमवार म्हणून रात्रीं ईश्वर-पार्वती यांची हत्ती-घोड्यासह मिरव-णूक पाहिली. ता. ७-९-४८ ला सकाळीं स्नानें करून आणलेल्या सेतूची यथासांग पूजा करून त्याच्या तीन भागांपैकीं एक भाग एका रिकाम्या केलेल्या नारळाच्या (सबंध) कवटींत भरून मेण-

बत्तीनें तोंड बंद करून प्रयाग क्षेत्रांत विसर्जन करण्यास घेतला. प्रयागहून आणलेली गंगा श्रीरामेश्वराला तेथील त्या दिवशींच्या पुजाऱ्यांनीं घातलेली पाहिली. सर्वांची गंगा एकत्र करून बापू पुजाऱ्यानें एकच पास काढला.

ता. ८-९-४८ ला सकाळींच स्नानें आटोपून देवदर्शन घेऊन आलों. एक आणा देऊन कोटितीर्थाचें (हें २४ वें तीर्थ आहे.त्याचें स्नान झालें कीं गांव सोडावयाचा असतो.) पाणीं उपाध्यानें आणलें. आम्हांस गंध, भस्म, प्रसाद दिला. नंतर कोटितीर्थाचें स्नान करून संभावना भागवून झटक्यांतून स्टेशनवर आलों. (हद्द सुटेपर्यंत जेवणखाण, मलमूत्रसुद्धां करणेचें नाहीं, असें म्हणतात.) सकाळीं १० वाजतांच गाडींत बसलों. पंबम् जंक्शनवर गाडी बदलावयाची म्हणून उतरलों. येथेंहि भिकारी त्रास देतातच. पुढें एक्स्प्रेसनें दुपारीं दोन वाजतां रामनाडला पोहोंचलों.

## रामनाड

रामनाडला धर्मशाळा गांठली व खोली घेऊन राहिलों. ता. ९-९-४८ ला पहाटे ४ वाजतां नवपाषाण (देवीपट्टण) चे मोटारी-साठीं जवळच असलेल्या स्टँडवर आलों. गर्दीतून तिकिटें काढलीं व सुमारें अर्ध्यापाऊण तासांतच नवपाषाणास आलों. बऱ्याच वाटा-घाटीनंतर मक्ता ठरवून समुद्रस्नानें केलीं. तेथेंच समुद्रांत असलेले नवग्रह यांची पूजा करावयाची असते. उपाध्ये सर्व करवितात. कमरेइतक्या पाण्यांत हे नऊ ग्रह आहेत. तेथून ९-३० वाजतां श्रीरामचंद्रांनीं दर्भावर जेथें शयन केलें होतें, तें दर्भशयन पहाण्या-साठीं थेट मोटारीनें परत रामनाडवरूनच (दुसऱ्या बाजूला) गेलों. दर्शन करून परत रामनाड येथें आलों. जवळच खानावळींत जेवणें (कमीजास्त भातासाठीं वेगळे दर देऊन) केलीं.

## श्रीरंग

ता. १०-९-४८ रोजीं संध्याकाळीं ४–३० च्या सुमारास धनुष्कोडी–मद्रास गाडीनें आम्हीं श्रीरंगास जाण्यास निघालों. रात्रीं १२ वाजतां श्रीरंग स्टेशनावर आलों. त्रिचनापल्लीपासून पंड्याचा नोकर भेटला. आठ आण्यास दोन झटके केले व देवळा-जवळच मारवाडी धर्मशाळेंत उतरलों. सकाळीं कावेरीस्नान करून श्रीरंगासुद्धां आठ देवांचीं दर्शनें घेतलीं. नेपाळेश्वरानें सोन्याचें शिखर बांधलें आहे. त्यांत सोन्याची मूर्ति पण आहे. श्रीरामाचे धनुष्यबाणहि सोन्याचे आहेत, असें म्हणतात. दुपारीं त्रिचना-पल्लीचे मोटारवसनें श्रीजंबुकेश्वराचे दर्शनास गेलों व नंतर पुनः वसनें कावेरीकाठींच टेकडीवरील गणपती पहाण्यास मी गेलों.

## त्रिचनापल्ली–कुंभकोणम्

दर्शन घेऊन कावेरी नदीसह सर्व त्रिचनापल्लीचें दिसणारें मनोहर चित्र पाहिलें. या भागांतील लोक येथें हवा खाण्यास येतात. देखावा ठीक असून हवा चांगली आहे. ता. १२-९-४८ ला सकाळीं ११–४५ ला कुंभकोणम्ला जाण्यासाठीं श्रीरंग सोडलें. गोल्डनरॉकवर गाडी बदलावी लागली व कुंभकोणम्ला संध्याकाळीं पांच वाजतां पोहोंचलों. स्टेशनहून गांव दीडदोन मैल दूर म्हणून गाडी करून ब्राम्हण धर्मशाळेंत उतरलों. सकाळीं नदीवर स्नानें करून चक्रपाणी, कुंभेश्वर, शृंगारपाणी व श्रीरामदर्शन घेतलें. जेवणें करून दुपारीं ४–४५ च्या गाडीनें निघून मायावरम्वरून रात्रौं ९ वाजतां चिदंबरम्ला पोहोंचलों. स्टेशनवरून झटका करून एकदीड मैल गांवांत धर्मशाळेंत गेलों. मॅनेजर गुजराथी होता; पण मराठी बोलला.

## चिदंबरम्

ता. १३ ला सकाळीं स्नानें करून शिवपार्वती, मंगलमूर्ति व श्रीकार्तीकस्वामी यांचीं दर्शनें घेतलीं. श्रीकार्तीकस्वामीचें देवालय १९४७ सालींच पुन: बांधवून रंगविलें असावें. आंतील चित्रें फारच मनोहर देखावा दाखवितात. मुख्य देवाचा कळस सोन्याचा असून त्याला ३६ हजार गिनी लागल्या, असें समजलें. श्रीशंकराची तांडवमूर्ति सोन्याची आहे. दर्शनें घेऊन जेवणें आटोपून परत चिंगलपुट येथें जाण्यासाठीं स्टेशनवर गाडी करून आलों. गाडी १०–४५ वाजतां निघाली. लेट होतीच. कड्डालूर व विळ्ळूपुरम् जंक्शनवरून संध्याकाळीं ६ वाजतां चिंगलपुट स्टेशनवर आलों. झटका करून धर्मशाळेंत आलों. खोलीभाडें आठ आणे पडलें. ता. १४-९-४८ ला सकाळीं स्नानें करून ८–४० वाजतां मोटारीनें पक्षितीर्थास निघालों. स्टँड स्टेशनवरच आहे.

## पक्षितीर्थ

'सेव्हन पॅगोडाज्' [ Seven Pagodas ] नांवाचें गांव नऊ मैलावर आहे, तेथें उतरून टेकडी चढावी लागते आणि ईश्वराची पिंडी व त्रिभुवनेश्वरीचें दर्शन घेऊन थोडें खालीं देवळाजवळच दगडांत थोडें पाणी दिसतें, तेंच पक्षितीर्थ. त्या पाण्यानें मार्जन करतात. त्याच सुमारास ११–१५ वाजतां देवळाच्या शिखरावर एक पांढरी घार दिसूं लागली. तिलाच पक्षिराज असें म्हणूं लागले. बाराचे सुमारास तेथील उपाध्या खीर, पूजासाहित्य घेऊन येऊन पक्षिराजांना आवाहन करून नमस्कार घालतो. मग दोन्ही घारी खालीं येऊन नैवेद्याची गव्हाची खीर खातात. दोन्ही पक्षी माणसाळलेले दिसले. काशींत विश्वनाथाचें दर्शन, रामेश्वरांत स्नान आणि येथें

भोजन हे पक्षी नित्य करतात, असें म्हणतात. उरलेली खीर प्रसाद एकेक आण्याला थोडी विकतात. टेकडीखालीं खानावळींत जेवणें केलीं व परत मोटारीनें चिंगलपुट येथें आलों. सायंकाळीं ५-३० च्या गाडीनें कांजीवरम्‌ला निघालों.

## कांजीवरम्

रात्रीं ८-३० चे सुमारास तेथें पोहोंचलों. झटका करून नारायणदास यांचे धर्मशाळेंत उतरलों व देवदर्शन ( शिवकांचीचें वालुकामय ईश्वरलिंग ) कामाक्षीनें स्थापन केलेलें पाहून कामाक्षी-चें व विष्णुदेवांचेंहि दर्शन घेऊन धर्मशाळेकडे परतलों. ता. १६ ला देवल कृष्णय्या यांचें उपाध्येपण पत्करून क्षौर, श्राद्ध, पिंडदान व ब्राम्हण-सुवासिनीसह भोजन केलें. दुपारीं झटका करून विष्णु-कांचीला गेलों. श्रीविष्णु, लक्ष्मी, नरसिंह वगैरे देवांचीं दर्शनें घेऊन सोन्याची (गिलीट असावें) पाल हात लावून पाहिली. पालीला स्पर्श केल्यानें पल्लीपतनाचा दोष लागत नाहीं, असें म्हणतात. नंतर परत येऊन पुनः शिव व कामाक्षी-दर्शन घेऊन जुनाट आम्र-वृक्ष व खालीं आम्रेश्वर पाहून आलों. ज्याचेत्याचे कर्माप्रमाणें आंबट, खारट वा गोड अशीं फळें हा वृक्ष देतो, असें म्हणतात. नंतर पुनः वामनाचें देऊळ पाहिलें. एका कळकाच्या उंच टोकाला मशाल लावून वामनमूर्तीचें दर्शन घेतात.

दुसरे दिवशीं ता. १७ रोजीं सकाळीं स्नानें, देवदर्शन करून उपाध्याचे घरींच जेवणें केलीं व झटका करून दुपारचे गाडीनें श्रीतिरुपतीला निघालों. आरकोणम् व रेणीगुंटा स्टेशनांवर गाडी बदलावी लागली. सध्याकाळीं ६-३० चे सुमारास तिरुपति स्टेशन-वर उतरलों व जवळच देवस्थानची धर्मशाळा आहे, तेथें एक खोली घेऊन राहिलों. त्या धर्मशाळेंत रेल्वेचें तिकिट-ऑफिस,पोस्ट-

ऑफिस, खानावळ, चहाचें हॉटेल व मोटार-स्टँड अशा सर्व सोयी आहेत. खानावळींत राईस-प्लेट घेतल्या व झोंपलों.

## तिरुपति

ता. १८-९-४८ ला सकाळीं स्नानें करून श्रीगोविंदराज व रामदेव यांचे दर्शनास गांवांत गेलों. गोविंदराजपट्टण[1] गांव बरा आहे. देवदर्शनाच्या वेळा ठरलेल्याच आहेत. दुपारीं जेवणें करून तिरुपति डोंगरावर जाणारी मोटार निघेपर्यंत मागील आवारांत स्टँडवर बसलों. २—३० वाजतां पहिली मोटार फक्त ' First Class ' मिळाली. तिकिटांशिवाय सर्व बांकीचे सामानाचा चार्ज द्यावा लागतो (वजन करतात.) चौघांत दोन रुपये तेरा आणे पडले. सेकंड क्लासचें तिकिट रु. १—३—० पडतें. तीं तिकिटें मांगाहून देतात. संध्याकाळीं पांच वाजतां तिरुपतीला पोहोंचलों. देवळाजवळ मोटारी जातात. कुली करून सामान व आम्हीं देवळाच्या मागील वस्तींत श्रीकृष्ण राजेंद्रछत्रांत (धर्मशाळा) मुक्काम केला. रात्रीं ८—३० चे सुमारास श्रीवेंकटेशाचे दर्शनाला गेलों. गर्दी बरीच असते. दुपारीं एक व रात्रीं एक तास धर्मदर्शन असतें. इतर वेळीं पैसे देऊन वगैरे दर्शन, पूजा असें असतें. वेंकटेशाची मूर्ति भव्य शंखचक्र गदाधारी असून लोक ' वेंकटरमणा गोविंदा ' असा जयघोष बारींतून सारखा करीत असतात.

## पापनाशिनी

ता. १९-९-४८ ला विश्रांति व दर्शन करून ता. २० ला सकाळीं डोंगरांत २—२॥ मैलावर पापनाशिनीचे स्नानास गेलों. डोंगराचे कड्यावरून दोन धारा जोरानें पडत असतात. त्यांपैकीं एक ब्रम्हतीर्थ व दुसरें पापनाशिनी तीर्थ. निसरडें असतें म्हणून धरण्यास साखळदंडाची सोय केलेली आहे. परत येतांना जवळच

दीड मैलावर आकाशगंगा नांवाचा लहान ओघ पाहून आलों. (डोंगरांतील पडणारें पाणी कुंड वगैरे बांधून केलें आहे.) फक्त मार्जन केलें. वाटेंत भिकारी असतातच. जेवणानंतर दुपारीं मुख्य देवळाजवळील पुष्करणी तीर्थावरील वराह देवाचें दर्शन घेऊन बाजारांतून महंतांचे मठांत गेलों व रामदर्शन केलें. आतां महंत गेलेले असून व्यवस्था सरकारमार्फत चालते. रात्रीं पुनः दर्शन (श्रीवेंकटेशाचें) घेऊन धर्मशाळेंत निजलों.

## गोविंदराजपट्टण

ता. २१ ला भोजनोत्तर तिरुपतीवरून १२-३० चे मोटारीनें गोविंदराजपट्टणास दोन वाजतां धर्मशाळेंत आलों. सामान खालीवर करणेस येथें पैसे पडतात. संध्याकाळीं तीन मैलावरील पद्मावतीचे दर्शनास झटका करून गेलों. संध्याकाळीं ६ ते ७-३० दर्शन होतें. परत लवकर आल्यानें गोविंदराजपट्टणांत देवळांत जाऊन गोविंदराजदर्शन घेतलें. मूर्ति निजलेली असून भव्य आहे. यालाच कोणी कुबेर तर, कोणी विष्णु असें म्हणालें.

ता. २२ रोजीं परत निघावयाचे म्हणून गुंटकलचीं तिकिटें घेतलीं (रझाकारांच्या दंग्यानिमित्त हुबळीचीं दिलीं नाहींत) व दुपारीं २-१० चे गाडीनें रेणीगुंटा येथें गाडी बदलून कडप्पा गुत्तीवरून ता. २३ ला सकाळीं ६ वाजतां गुंटकल स्टेशनांत उतरलों. होसपेटपर्यंतची तिकीटें देऊं, असें मास्तरानें सांगितलें. तशीं तिकीटें घेऊन ९-३० वाजतां निघून होसपेट स्टेशनवर १२ वाजतां पोहोंचलों. तिकीटें बंद असल्यानें कित्येक लोक स्टेशनांत व आसपास गर्दी करून होते.

## श्रीविरूपाक्ष

टांग्यानें धर्मशाळेसाठीं गांवांत आलों. निर्वासितांनी सर्व

जागा आडविल्या होत्या. एका हॉटेलांत रोज दीड रुपया देऊन तिसऱ्या मजल्यावर जागा होती; पण आम्हीं तीन रुपयांस एक झटका करून सात मैलांवर हंपीस आलों. साधारण खोली मिळाली. २-३ दिवस तुंगभद्रास्नान व विरूपाक्षदर्शन करून हुबळीचीं तिकिटें मिळतील, तेव्हां जाण्याचें ठरविलें. श्रीविरूपाक्षाचें दर्शन सकाळीं ८ ते ९ व १० ते १२ पर्यंत होतें. रात्रीं उत्सव-मूर्तीची आरती वगैरे असते. प्राकार बराच मोठा आहे; पण सर्वत्र पडापड झालेली आहे. पाण्याचा पाट आहे. ता. २४ ला नारळ-कापूर करून मुख्य विरूपाक्षाचें दर्शन घेतलें. नारळ फोड-णेस दोन आणे पडले. अभिषेकाची वहिवाट नाहीं. ता. २५ ला पावसाचा रंग व सर्वच वृद्ध म्हणून इतर कांहीं केलें नाहीं. मी मात्र कडलीकाळू गणपती पाहून आलों.

हुबळीचीं तिकिटें आज मिळूं लागल्याचें कळलें. ता. २६ ला स्नानें, जेवणें आटोपून सामान आवरून होसपेटला जाणाऱ्या मोटारची वाट पहात गणपतीचे देवळांत बसलों. दुपारीं तीन वाजतां मोटार आली, परतली व होसपेट गांठलें. होसपेट मोटर-स्टँडवर आलों, तेव्हां फारच जोराचा पाऊस पडला. रेस्ट हाऊस-मध्यें उभें राहणेंहि कठीण झालें. हुबळीकडे एकच गाडी सुटे व ती दुसरे दिवशीं दुपारीं एक वाजतां असल्यानें रमाविलास हॉटेलमध्यें भाड्यानें एक खोली घेऊन राहिलों. ता. २७ ला जेवण करून झटका करून स्टेशनवर आलों व गर्दीतून नंबरानें तिकीटें काढून गाडींत कसेबसे शिरलों. गदगवरून हुबळी स्टेशनवर रात्रीं सात वाजतां आलों व एक्का करून कारवार मोटार सर्व्हिसचे डी. के. कामत यांचा तपास केला. त्यांच्या मॅनेजरनें गेस्ट हाऊसमध्यें आमची सोय केली. ता. २८ ला सकाळीं स्नान करून स्टँडजवळच्या एका ब्राम्हणी हॉटेलांत

जेवण केलें व दुपारीं दोन वाजतांचें मोटारनें गोकर्णास निघालों.

## गोकर्ण

कलघटगी-यल्लापूर-अंकोल्यावरून नदी ओलांडून गोकर्णास रात्रीं ९॥ वाजतां पोहोंचलों. स्टँडवरून देवळाजवळ शेषंभटजी मुळ्ये यांचे घरीं हमाल करून सामान घेऊन गेलों. एक खोली घेऊन राहिलों. सुमारें वीस वर्षांनंतर मी पुनः गेलेला, म्हणून शेषंभट, नारायणभट वगैरे सर्वांशीं थोडी बातचीत केली. दुसरे दिवशीं ता. २९ ला सकाळीं भाऊराव आपल्या उपाध्याकडे गेले. रंगाण्गांनीं दोन महिन्यांपूर्वीं यात्रा केली होती, म्हणून मी व गणपतराव ( जोशी मास्तर ) दोघांनीं कोटितीर्थावर क्षौर व ससंकल्प स्नानें केलीं. नंतर गणपतीचे देवळांत जाऊन पूजा करून श्रीगोकर्ण महाबळेश्वराला महापूजा केली ( पंचामृत, पंचधान्यें, रुद्रावर्तन व अष्टोत्तरशत बिल्वदलें वाहणें अशी महापूजा ). पूजेला देवाचा मुखवटा मुद्दाम कांहीं वेळ आणून घातला होता. दुसरे दिवशीं श्राद्धें व पिंडदान करण्याचें ठरवून त्याबद्दल प्रत्येकीं दहा रुपये ठरविले. ता. ३० ला सकाळीं ससंकल्प समुद्रस्नानें करून देवदर्शनें केलीं. येथें श्रीगजानन उभा असून दोनच भुजांचा (बटुवेषधारी) आहे. रावणानें मुटके डोक्यावर मारल्याचेंहि दाखवितात. घरीं आल्यावर श्राद्धें, पिंडदान व जेवणें केलीं व संध्याकाळीं रामतीर्थ पाहून देवळांत आरती पाहून आलों व वे. मू. शेषंभटजीस संभावना देऊन प्रसाद, नारळ व कुंकू वगैरे घेतलें. नंतर वेंकण्णा येऊन चारला चहा करून उठवण्याचें सांगून गेले व बेळगांवास सकाळीं पांच वाजतां जाण्याचें ठरवून निजलों. ता. १-१०-४८ ला पहाटे चारला चहा वगैरे आटोपून ५-१० वाजतां सर्वांचा निरोप घेऊन अंकोल्यास निघालों. भाऊरावहि

त्यावेळीं आलेच.

गंगावळी नदी ओलांडण्यास प्रत्येकीं एक पैसा कर कोळ्यांना द्यावा लागतो. मोटारीसह (माणसें उतरवून) सर्वांना नावांच्या पुलावरून वल्हवून पलीकडे नेतात, त्यावेळीं कोळी गाणीं पण म्हणतात. ६-३० वाजतां अंकोल्यास पोहोंचलों. कर्नाटक सर्व्हिसची कारवारहून पहिली गाडी ९-२५ वाजतां येते, तोंपर्यंत वेळ रेंगाळत काढला. मोटार आली व आम्हीं तिकिटें घेऊन बसलों व यल्लापूर-हलियाळ-अळणावर-खानापूरवरून संध्याकाळीं ५-४५ ला बेळगांवीं येऊन पोहोंचलों व अशा प्रकारें रामेश्वर-यात्रा संपविली.

—★—

– ३ –

# भिमाशंकर

ता. २२-२-४९ ला बेळगांव ते पुणें मेलगाडीनें निघालों; बरोबर रंगाण्णा व भाऊराव होते. भिमाशंकर व प्रयागास सेतु-विसर्जन करून येण्याचें ठरविलें होतें. ता. २३ ला सकाळीं पुण्यास श्री. जोशी मास्तर यांच्याकडे उतरलों. एकादशी होती,

म्हणूस दुपारीं आळंदी ( देवाची ) पाहण्यास मोटारनें गेलों. इंद्रायणीस स्नानें करून श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीचें दर्शन घेतलें; इतर देव व नरसिंहसरस्वतिमठ व ज्ञानेश्वरांनीं चालविलेली निर्जीव भित पाहून परत मोटारीनें पुण्यास आलों. ता. २४ रोजीं पुन: भिमाशंकरला जाणाऱ्या मोटारीची चौकशी केली. नक्की माहिती मिळेना, म्हणून मंचरचीं तिकिटें काढलीं. विलेपार्लें येथील डॉ. धराधर नांवाचे एक वृद्ध गृहस्थ व जोशी मास्तर असे पांच जण तीन वेगवेगळ्या मोटारींतून ८ चे सुमारास मंचर येथें पोहोंचलों. पुढील मोटार मिळाली नाहीं, म्हणून रात्रीं स्टँडवर रस्त्याचे बाजूला पडून राहिलों. शिवरात्रीनिमित्त गर्दी फार होती. ता. २५ ला सकाळीं ७-३० वाजतां तिकिटें मिळालीं व मोटारींत बसलों. आज महाशिवरात्र होती. वीस मैलांवर टायर फाटली. एस्. टी. ची दुसरी मोटार मंचरला गेली व टायर आणून पुढें निघालों. २ तास खोटी झाली. दुपारीं एक वाजतां देवळा-जवळ पोहोंचलों. वाटेंत कॉलरा इंजेक्शन् सुरू होतें, म्हणून डोंगरांतून आड वाटेनें गेलों. म्युनिसिपल कर एक आणा दिला. देवळाजवळ २-३ तीर्थकुंडें आहेत. त्यांत स्नान करून श्री-भिमाशंकराचें दर्शन पूजा करून फराळाचें सामान खरेदी करून फराळ करून ३-३० चे सुमारास परत पुण्यास येण्यासाठीं मंचरची मोटार पकडली. मंचरहून तासाभरांत मोटार मिळाली व रात्रीं ९ वाजतां पुणें मुक्कामीं आलों.

# अलाहाबाद

ता. २६-२-४९ रोजीं संध्याकाळीं ५-४० चे गाडीनें मुंबईला निघालों व रात्रीं १० चे सुमारास दादर स्टेशनवर उतरलों व चि. अण्णाचे घरीं आलों ( [redacted] ता. २७ ला नेहमींप्रमाणें स्नानें आटोपून माटुंग्याला एका बालमहंताचें दर्शन घेऊन आलों. येतांना काशीविश्वेश्वराचें तेथील देवळांत जाऊन दर्शन करून परतलों. घरीं सर्वांनीं जेवणें करून जरा विश्रांती घेतली. रात्रीं आठ वाजतां लोकल गाडीनें मुंबईला (Victoria Terminus) सर्व सामानासह गेलों व मी चि. नानाचे मदतीनें अलाहाबादचीं तिकिटें घेतलीं व अलाहाबाद एक्स्प्रेसनें नंबर ११ चे प्लॅटफॉर्म-वरून निघालों. चि. नाना दादरला उतरला. ( कल्याण, नाशीक, मनमाड, पाचोरा, भुसावळ वगैरेवरून ) भुसावळपर्यंत जागा (व झोंप पण) चांगली मिळाली. भुसावळपासून पंडे गांठ पडूं लागले. जबलपूर-कटनी-नैनीवरून ता. १-३-४९ ला सकाळीं ६ चे सुमारास अलाहाबादवर आलों. टांगा करून तीन मैल गांवांत वे. रा. उमाकांत पैठणकर (आमचे गत वर्षींचे उपाध्ये)यांचे घरीं आलों.

श्री. पैठणकर काशीला गेल्याचें समजलें. पण त्यांच्या कुटुंबानें आमची सेतुविसर्जनासंबंधीं सर्व कार्यें करवून दिलीं. ता. २ ला युनिव्हर्सिटी पाहणेस जावें, असें ठरलें. परंतु मध्य प्रदेशाच्या गव्हर्नर श्री. सरोजिनी नायडू वारल्या, म्हणून सर्व व्यवहार बंद असल्यानें गेलों नाहीं. पण बोटींतून त्रिवेणीवर जाऊन स्नानें केलीं. किल्ल्यावरील देव, अक्षय वट व निजलेला मारुती वगैरे पाहून पुनः घरीं येऊन जेवणें केलीं व विश्रांती घेतली. ता. ३ रोजीं सकाळींच अलाहाबादच्या ‘ इझतब्रिज ’

स्टेशनवरून ( छोटी लाईन ) बनारस कँट स्टेशनवर आलों. सुमारें १-३० वाजला होता. श्रीकालभैरवाचे देवळाजवळ टांगे येतात, तेथें उतरून हमाल करून घेऊन वे. रा. भास्कर कृष्ण शिधोरे यांचे घरीं आलों (गत वर्षीचेच उपाध्ये). कांहीं वेळानें चहा वगैरे घेतल्यावर स्वत: भास्करभटजी आले ( त्यांची गांठ गेल्या खेपेसहि पडली नव्हती. त्यांचे जामात गयाक्षेत्रीचे मराठे यांनीं सर्व व्यवस्था व कार्यें करवून दिलीं होतीं ). ओळखी झाल्यावर सेतु-विसर्जनासाठीं प्रयागास आलों होतो व जातांजातां श्रीकाशी विश्वनाथाचे दर्शनासाठीं काशीस आलों, वगैरे बोलणीं करून गंगेवर स्नानास गेलों. स्वत: भास्करभटजीनीं ससंकल्प स्नानें करविलीं. त्यांचे घरीं येऊन जेवणें केलीं ( तीन-चार दिवस मुक्काम करून जमल्यास पुरी अगर नेपाळांत पशुपतीश्वर-दर्शन करण्याचा आमचा विचार, पण कारणपरत्वें कांहीं जमलें नाहीं ).

ता. ५ रोजीं जातांयेतां टांगे करून भारतमाता-मंदिर पाहून आलों. जमिनीवर (माती, चुना, व सिमेंट) अखंड हिंदुस्थानचा नकाशा, भोंवतीं डोंगर-समुद्रासह फारच चांगला तयार केलेला आहे. पाहण्याजोगें आहे. शक्यतों रोज श्रीविश्वनाथाचें दर्शन, तसेंच कालभैरव-दर्शन करीत असूं. ता. ७ रोजीं सकाळीं श्रीकाशीविश्वनाथाला रुद्राभिषेक करविला ( अभिषेक देवळांत करीत नाहींत अगर करूं देत नाहींत, तर गंगेवरच करावयाची पद्धत. देवाचे डोक्यावर गंगा आहे, तेव्हां देव तेथें आहेच). दुपारीं नावेंतून हरिश्चंद्र घाटाकडे केदारेश्वराला गेलों. दर्शन घेतलें. हें दर्शन घेऊन कोठेंहि मरण आलें तरी मुक्ति मिळते, असें म्हणतात. रात्रीं मंत्रपुष्प घरींच करविला. कोठेंहि ऐकले नाहींत, असे मनाला वेधून टाकणारे वेदघोष ऐकून आनंद झाला. ता. ८ ला मोगलसराईवरून परत मुंबईस परतलों.

# औदुंबर व इतर यात्रा

ता. ८-१०-४९ रोजीं श्रीऔदुंबरास जाणेसाठीं सकाळीं सात वाजतां बेळगांवहून निघालों व सुमारें दोन वाजतां भिलवडी स्टेशनवर पोंचलों. टांगा करून भिलवडी गांवीं नदीपर्यंत गेलों व होडींतून नदीपार गेलों. श्रींचें दर्शन घेतलें. बाळंभट केशव पुजारी यांचेकडे चहा घेतला व दुसरे दिवशीं श्रीस अभिषेक व नैवेद्य करविला व संध्याकाळीं परत भिलवडीवरून मिरजेस आलों. स्टेशनवरून श्री. अष्टपुत्रे यांचे घरीं (अभ्यंकर वाडा, हंस टॉकीज्‌जवळ) टांगा करून गेलों. रा. रा. देसाई तेथें होतेच. सोमवार ता. १० रोजीं सकाळीं दहाचे गाडीनें पंढरपूरला जाण्यास निघालों.

## पंढरपूर

संध्याकाळीं पांच वाजतां टांगा करून गांवांत पोहोंचलों. श्रीपांडुरंगाचें दर्शन घेतलें. दुसरे दिवशीं नदी-स्नान आटोपून श्रीस नैवेद्य, ब्राम्हण-सुवासिनी करवली व ता. १३ ला लातूर येथें जाण्यास निघालों. संध्याकाळीं गाडींत बसलों ते १४ ला सकाळीं लातूरास पोहोंचलों.

लातूरपासून हैदराबादचें चलन सुरू झालें. आमच्या एक रुपयाला हाली १ रुपया २॥ आणे मिळाले. लातूर ते लातूर रोड स्टेशन ( हैदराबाद रेल्वे ) पर्यंत मोटारप्रवास केला. स्टेशन वर १॥ तासांत गेलों. तेथें फराळ करून गाडींत सुमारें ४॥ ला संध्याकाळीं बसलों. एखादी दुसरीच गाडी या लाईनवर जाते.

## परळी वैजनाथ

परळी वैजनाथचीं तिकिटें काढलीं व परभणीमार्गे रात्रीं ८ चे सुमारास परळी वैजनाथ स्टेशनवर आलों. गांवांत प्लेग असून लोक झोपड्यांत राहतात, असें समजलें. स्टेशनवर पंडे अगर उपाध्ये कोणीहि भेटले नाहींत. स्टेशनवरील खानावळींत तीन राईस प्लेट (दोघांत) घेऊन जेवलों व वेटिंग रूममध्यें निजलों. सकाळीं राघोबा दत्तात्रय जोशी, पुजारी, रिकामटेकडीजवळ, परळी वैजनाथ, भेटले. त्यांचेबरोबर झोपडींत गेलों; पण त्यांना सुतक असल्यानें त्यांनीं दगडगुंडे पुजारी यांचेकडून श्रीपरळी वैजनाथला अभिषेक, नैवेद्य करविला. हरिहर तीर्थ नांवाचे तलावांत स्नान केलें. अभिषेकानंतर १-१॥ मैल परत झोपडींत आलों व तेथेंच जेवण केलें व आणखी १-१॥ मैल चालून स्टेशन-वर आलों. गाडी रात्रीं अकरा वाजतां निघाली.

चौंढी स्टेशनवर उतरणेचें म्हणून चौंढीचीं तिकिटें काढलीं. पुढें सकाळीं सात-आठचे सुमारास (ता. १५) चौंढी स्टेशनवर उतरलों. ( Hingoli Line )

## औंढ्या नागनाथ

तेथून औंढ्या नागनाथास जाणारी मोटार तयार होती. तींत बसून दोन तासांनीं (१२-१४ मैल) नागनाथास पोहोंचलों. हरी अण्णा पाठक नांवाचे पुजारी यांचे घरीं राहिलों. नागतीर्थांत स्नान करून तेथेंच श्रीशनैश्वराचें दर्शन घेतलें व श्रीनागनाथाचे दर्शनास गेलों. मुख्य लिंग भुयारांत आहे, म्हणून बसून उतरावें लागतें. अभिषेक, पूजा वगैरे करवून ब्राम्हण-सुवासिनी केली. ता. १६ ला जेवणें आटोपून अकरा वाजतां परत मोटारनें चौंढी स्टेशनवर आलों. (हैदराबाद संस्थानांत प्रत्येक मोटारींत चढतांना

व उतरतांना एका बोजाला एक आणा हमाली द्यावी लागते). इकडील जंगलांत सिताफळीचीं झाडें बरींच दिसतात. श्रीनागनाथाचे देवळाचे नागतीर्थावर 'विनायकानंद' नांवाचे एक यती भेटले.

सुमारें दीड वाजतां चौंढी स्टेशनवरून निघून पूर्णा जंक्शनवर ३ वाजतां आलों. चाराचे सुमारास मनमाडला जाणारी मोठी गाडी आली, तींत बसून रात्रीं दहाचे सुमारास औरंगाबाद स्टेशनला पोहोंचलों. या गाडींत तिसऱ्या वर्गाचे डब्यांत विजेचे पंखे आहेत. स्टेशनजवळच एक हिंदू धर्मशाळा आहे. तेथें रोज ३ आणे भाडें देऊन नंबर दोनचे खोलींत मुक्काम केला. हें भाडें विजेचें आहे. बाकी सर्व फुकट. मात्र एक रु. अमानत रक्कम म्हणून ठेवून पावती घ्यावी लागते. ता. १७ ला सकाळींच मोटार स्टँड (स्टेशनवर आहे) वर गेलों; पण मोटार भरून गेली, म्हणून बारा वाजेपर्यंत थांबलों.

## घृष्णेश्वर

नंतर मोटारनें दौलताबादवरून वेरूळास गेलों. दुपारीं तीन वाजले होते. स्टँडवर भटजी लोक होते. पैकीं श्री. प्रल्हाद आत्माराम विटेकर यांचे घरीं गेलों. चहा घेऊन शिवतीर्थावर ससंकल्प स्नान केलें व तसेच देवळांत गेलों. विटेकरांनीं (त्यांना लोक सावकार म्हणत.) दुसऱ्याकडून आमचा अभिषेक व घृष्णेश्वराची पूजा करविली. सुवासिनी-ब्राम्हणहि सोमवारींच करून आम्हीं तेथेंच विटेकरांकडे जेवलों. इकडे पूजा-साहित्याचे पैसे घेतात. विटेकर भटजी पंडे लोकांपेक्षांहि जास्त घासाघीस करून पैसे काढण्यांत पटाईत दिसले. ता. १८ ला सकाळीं प्रातर्विधीसाठीं एक मैल शिवतीर्थाकडे गेलों. नंतर पुढें अर्धा मैल

श्रीघृष्णेश्वराचे देवळांत गेलों. लहानशी नदी आहे. तेथें स्नानें उरकून देवाला पाणी घालून पुढें एक मैलावर वेरूळचीं लेणीं पाहणेस गेलों. नंबर १०, १६ व २९ हींच पाहण्यासारखीं आहेत. वाटाड्या घेऊन लेणीं पाहणेस एक रुपया द्यावा लागतो.

घरीं परत येऊन विटेकरांकडे जेवण केलें व सर्व पैसे देऊन मोटार-स्टँडवर आलों. ११-१५ वाजतां मोटार आली, पण जागा नाहीं. कन्नडहून भरून आली म्हणून तेथेंच बसलों. १२ वाजतां औरंगाबादहून एक रिकामा मोटार ट्रक आला, तो एक वाजतां माल घेऊन परत औरंगाबादला जाणार, असें समजलें. ड्रायव्हरला पॅसेंजर गाडीप्रमाणें भाडें कबूल करून परत औरंगाबादेस निघालों. सकाळींच लेणीं पाहिलीं होतीं व रंगाण्णाचे पाय दुखूं लागले म्हणून दौलताबादचा किल्ला दुरूनच न चढतां पाहिला. वाटेंत पाऊस पण (जोराची सर) पडला. इकडे सिताफळें व बोरीचीं झाडें बरींच दिसलीं. मोटारीचा भरंवसा नसतो व लोक थोडे अविश्वासूच असें कळलें, म्हणून दौलताबादेस वळसा घालून थेट औरंगाबाद गांठलें. पुनः धर्मशाळेंत पहिल्याच खोलींत बिऱ्हाड ठोकलें.

## औरंगाबाद

ता. १९ ला औरंगाबाद गांव पाहणेस पायीं गेलों. बाजारांत सुपारी मारुतीपर्यंत जाऊन परतलों. जातांयेतां सुमारें ४-५ मैल असेल. ता. २० ला सकाळीं टांगा करून पाणचक्की व बीबीचा मकबरा (कबर) पाहून आलों. मशीद, मनोरे ताजमहलसारखेच आहेत. गुरुवार सोडून रात्रीं १०-१० वाजतां मनमाडकडे निघालों. मुंबई- दादरचें तिकीट काढलें होतें. मनमाडला गाडी बदलली. ता. २१ ला सकाळीं ६-३५ वाजतां

दादरला आलों. हमाल करून विऱ्हाडीं आलों. स्नानें आटोपून बी. बी. सी. आय्. चे स्टेशनांत पुढील प्रवासासाठीं रेल्वेचें वेळापत्रक घेतलें व देवदर्शन करून घरीं येऊन जेवण केलें व विश्रांति घेतली. संस्थान हैदराबादमधील तीन्हीं ज्योतिर्लिंगें करून तिकडील प्रवास संपवून गुजराथ व सौराष्ट्राकडील देवस्थानच्या प्रवासास ता. २२-१०-४९ ला सुरवात केली.

— ६ —

# सौराष्ट्रांतील यात्रा

ता. २२-१०-१९४९ रोजीं सायंकाळीं सात वाजतां दादरवरून लोकलनें बी. बी. सी. आय्. चे सेंट्रल स्टेशनवर गेलों. तिसऱ्या वर्गाची वेटिंग-रूम व बुकिंग-ऑफिस जरा दूर आहेत. तेथें जाऊन थेट डाकोरचें तिकीट घेतलें व प्लॅटफॉर्मवर पुनः आलों. थोडया वेळानें गाडी प्लॅटफॉर्मला लागली व लोकांची गर्दी सुरू झाली. जागा बरी मिळाली व गाडी ८-३० वाजतां रात्रीं सुटली, ती ता. २३ ला पहाटे पांच वाजतां आनंद येथें पोहोंचली. तेथें उतरून गोध्रा लाईनच्या गाडींत बसलों. गाडी उशीरा निघाली व आम्हीं १२-१० वाजतां दुपारीं डाकोर स्टेशनला पोहोंचलों व स्नानें गोमती नांवाचे तीर्थांत करून श्रीरणछोडजीचें दर्शन करून जेठालाल लक्ष्मीराम पंडया यांचे

२३।१०।५

घरीं माडीवर मुक्काम केला. प्रसाद विकत घेऊन दही-दूध आणून जेवणें आटोपलीं. संध्याकाळीं इतर देवांचें दर्शन करून तीर्थावर संध्या करून फराळ केला व निजलों.

ता. २४ ला टांगा करून स्टेशन गांठलें व आनंदवरून सिद्धपूर येथें जावयाचें असल्यानें अहमदाबादचीं तिकिटें घेऊन निघालों. सकाळीं सातचे सुमारास गाडी सुटली व आनंद येथें आठ वाजतां पोहोंचली. गाडी बदलून आम्हीं उभ्या असलेल्या अहमदाबादच्या गाडींत शिरलों. सुमारें १२ वाजतां अहमदाबादेस आलों. स्टेशनजवळच हिंदू आदर्श लॉज नांवाचे खानावळींत स्नान, जेवण केलें व खोली घेऊन राहिलों. दुपारीं ३-४ चे सुमारास दिल्ली एक्स्प्रेसनें सिद्धपूर येथें जाण्यासाठीं पुनः स्टेशनवर आलों व मेलचीं तिकिटें काढून गाडींत जाऊन बसलों. सिद्धपूर मेहसाणा स्टेशनपुढें ३-४ स्टेशनें आहे. रात्रीं आठ वाजतां तेथें पोहोंचलों व टांगा करून गावांत रणछोडजीचे मंदिरांत श्री. गोविंद केशव कोन्हाणे यांचेकडे उतरलों.

गंगा-पुत्रांची गर्दी स्टेशनपासूनच मागें लागते. स्टेशनजवळच गांवांत यात्रेकरूंकडून कर घेतात. गंगा-पुत्रांकडूनच येथें श्राद्धें व पिंडदान करवावें लागतें. ता. २५ रोजीं सकाळीं लवकरच सरस्वती नदीवर गेलों. तेथें नदींत पाणी नसल्यानें तयार केलेल्या डबक्यांतील पाणी बारडींत घेऊन गंगाभेट, क्षौर व स्नानें करून टांगा जातांयेतांचा करून अल्पा सरोवरावर गेलों. तेथें भगवानलाल नाथालाल दवे ( गंगा-पुत्र ) यांनीं श्राद्ध व पिंडदान मातोश्रींच्या नांवें करविलें (अल्पा सरोवर, बिंदू तीर्थ, ज्ञानवापी अशीं तीन स्नानेंहि केलीं.) नंतर कोन्हाणे यांचे घरीं जेवण केलें व पुनः टांगा करून स्टेशनवर आलों. श्रीरणछोडजीचे

मंदिरांत श्रीटेंभे स्वामींचा रंगीत फोटो लावलेला आहे.

थेट वेरावळचें तिकिट मिळालें नाहीं. म्हणून मेहसाण्याचें घेतलें. मेहसाणा येथेंहि वेरावळचें तिकीट देईनात. राजकोटचें घेऊन गाडीला अवकाश होता म्हणून, अ. स्टेशनमास्तर यांना भेटून तक्रार केली. तेव्हां सुमारें अर्ध्या तासानें त्यांनीं तिकिटें बदलून देण्याची तजवीज करविली. गाडी बदलून रात्रीं ८ वाजतां निघालों. विरमगांव, वांकानेर, राजकोट, जुनागड करीत दुसरे दिवशीं सायंकाळीं (ता. २६) चारचे सुमारास वेरावळ स्टेशन गांठलें. तेथून टांग्यानें तीन मैलांवर सोमनाथास आलों. श्रीचें मंदिर ( हें अहल्याबाई होळकरीण यांनीं ३०० वर्षांपूर्वीं बांधलें आहे ), बडोदेकरांची धर्मशाळा हीं सर्व एकाच आवारांत आहेत. तेथेंच सोमनाथाचे पुजारी सदाशिव बाळकृष्ण मुंढे राहतात. दोन विहिरी आहेत, तेथें स्नान वगैरे करून मुंढे यांचेकडे रात्रीं जेवण केलें व एका खोलींत राहिलों.

ता. २७ ला सकाळीं सुमारें अर्ध्या मैलावर असलेल्या त्रिवेणीवर स्नान करून आलों व श्रीसोमनाथाला महिम्नाची एकादष्णी करून पूजा केली. लिंग * अति भव्य असून श्री-पार्वतीची मूर्तीसुद्धा प्रेक्षणीय आहे. एकंदर परिस्थिति खरो-खरच मनाला आनंददायक आहे. सदाशिवभटजी मुंबईस गेले होते. त्यांच्या मुलाला कस्टमखात्यांत नोकरी असल्यानें सकाळींच

---

* श्रीसोमनाथाच्या जुन्या देवालयाचे अवशेष ( महंमद गझनीनें देवासुद्धा सर्व उध्वस्त केलेले ) पाहून आलों. तेथें कांहीं नसून हल्लीं पुनः लिंग-स्थापना व जीर्णोद्धार करणार, म्हणून नुसतें उत्खनन ( कांपाऊंड-मध्यें ) सुरू आहे.

एका बडोदेकराची एकादष्णी-पूजा करून ते निघून गेले. आम्हीं त्यांचेकडेच जेवलों. ता. २८ ला सकाळीं स्नान करून श्रीला अभिषेक (ब्राम्हण-सुवासिनी कालच केली होती) करून दहाचे सुमारास टांगा करून वेरावळ येथें द्वारकेस जाण्यासाठीं आलों. तिकिटें काढून परत राजकोट जंक्शनवर दुपारीं ३ चे सुमारास आलों.

रात्रीं आठपर्यंत द्वारकेची गाडी नव्हती, म्हणून फराळ करून टांगा करून गांव पाहिला व नंतर ६ चे सुमारास स्टेशन-वर परत येऊन बसलों. रात्रीं सातचे सुमारास तिकिटें काढून गाडी प्लॅटफॉर्मला लागली होती, तींत जाऊन बसलों. गाडी आठ वाजतां निघाली, ती दुसरे दिवशीं ता. २९ ला सकाळीं ६-३० वाजतां द्वारकेस पोहोंचली. टांगा करून १॥-२ मैल असलेल्या गांवांत गेलों व माई पाध्ये यांचे घरीं (धर्मशाळा) एक खोली घेऊन राहिलों. माईनीं चहा करून दिला, तो घेऊन ( इकडे सर्व स्टेशनांवर चहा मिळतो. ) श्रीद्वारकाधीशाचे देवळांत काकडा-आरती पाहणेस गेलों. इकडे काकडा-आरती उशीरां होते. दर्शनापूर्वी पडदा होता, नंतर दर्शन-आरती झाली. श्रीची मूर्ती डाकोर, सिद्धपूर यांसारखीच कृष्णवर्ण पाषाणाची सुरेख आहे.

समोरच श्रीदेवकीमातेचें मंदिर आहे, तेथें गुजराथी स्त्रिया गाणीं म्हणत बसतात. आजूबाजूस लहानलहान देवळें आवारांतच आहेत. दर्शन घेऊन एक आणा देऊन पास काढून गोमती संगमा-वर स्नानास गेलों. इकडे स्नानाचे जागीं कपडे धुण्यास मनाई आहे. एकंदर पाणी मचूळ असून भरती-ओहोटीबरोबर कमीजास्त होतें. पिण्याचें पाणी दीड आणा घागर मिळतें. पावसाचें पाणी सांठवून

तें लोक पिण्यासाठीं उपयोग करतात. आम्ही माईकडेच जेवलों.

सायंकाळीं गांवांतील इतर देवळें व सुमारें दीड मैलावर असलेलें श्रीरुक्मिणीमातेचें मंदिर पाहून आलों व द्वारकाधीशाची आरती पाहून दर्शन घेऊन परत येऊन निजलों. (कार्तिक शुद्ध ११ ता. १-११-४९ ला असल्यानें द्वारकेस मुक्काम केला.) ता. ३० ला विश्रांती घेतली व ता. ३१ ला सोमवारीं सकाळीं द्वारका बेटावर (ओखा बंदर) जाण्यासाठीं रेल्वे स्टेशनवर टांगा करून आलों. तिकिटें घेतलीं; पण गाडी दोन तास उशीरां आली व ४-५ स्टेशनें– मिठापूर वगैरे – गेल्यावर १० चे सुमारास ओखा बंदरवर आलों. समुद्रांतून शीड असलेल्या बोटीनें अर्ध्या तासांत बेटावर पोहोंचलों. बेटावर तिकडील यात्रेकरूंशिवाय इतरांकडून चार आणे प्रत्येकीं कर घेतात. येथेंहि पंडे आहेतच.

द्वारकेसारखीच श्रीकृष्णाची मूर्ति व देवकी वगैरेंचीं देवळें, लक्ष्मीभांडार वगैरे पंडे मागें लागून दाखवितात व पैसे मागतात. देवाचा दरवाजा उघडल्यावर दर्शन करून परत होडींतून स्टेशन-वर आलों. फराळ करून राजकोटची गाडी संध्याकाळपर्यंत नसल्यानें एका धर्मशाळेंत वशिला लावून एका गोड पाण्याचे नळावर अंघोळ केली. रात्रीं ९-३० ला द्वारका स्टेशनवर आलों. पॅसेंजर फार व टांगे थोडे त्यामुळें दर भडकले. आम्हीं बस्‌मधून घरीं आलों. १-११-४९ ला महाएकादशी. स्नान, दर्शन वगैरे नेहमीप्रमाणें झालें. लोकांची गर्दी वगैरे नव्हती. फराळ व द्वादशीचीं जेवणें माईकडे करून ता. २ ला संध्याकाळीं टांग्यानें स्टेशनवर आलों व थेट मुंबईचीं तिकिटें घेऊन रात्रींचे गाडीनें निघालों.गाडी बदलून विरमगांव येथें ता. ३ चे रात्रीं सौराष्ट्र-मेल-मध्यें बसलों व ता. ४ ला सकाळीं ११ वाजतां दादरवरून घरीं आलों.

# श्रीमल्लिकार्जुन यात्रा

ता. १२ फेब्रुवारी १९५० इसवीं रोजीं मी व श्री. रंगोपंत नाईक श्रीशैल्य पर्वतावरील श्रीमल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगाचे दर्शनासाठीं बेळगांवहून सायंकाळीं ४-३० चे गाडीनें निघालों. नंद्याळ रेल्वे स्टेशनचेंच थेट तिकीट काढलें. लोंढा, धारवाडवरून रात्रीं ९-३० वाजतां हुबळीस पोहोंचलों. गदगकडे जाणारी गाडी तयार होती, तेव्हां लगेंच तींत जाऊन ( गाडी बदलून ) बसलों. बरोबर दहा वाजतां गाडी सुटली, ती गदग, होसपेट, बल्लारी-वरून गुंटकल स्टेशनवर ता. १३ ला सकाळीं सात वाजतां पोहोंचली. दोन तासांनंतर तीच गाडी बिझवाड्याकडे निघाली व रखडत रखडत दुपारीं दोन वाजतां नंद्याळ स्टेशनवर पोहोंचली. स्टेशनवर थोडा फराळ केला व तिकिटें परत देऊन स्टेशनाबाहेर आलों. मोठा मंडप घालून त्यांत यात्रेकरूंना कॉलरा-प्रतिबंधक लस टोचून पुढें सोडीत.

गांव १-१॥ मैल, म्हणून एक टांगा ठरविला व त्यांतून मोटार-स्टँडवर आलों. तेथें आत्मकूर येथें जाणाऱ्या मोटारींत बसलों व २२-२५ मैलांवर असलेल्या पेदच्यूर गांवीं जाण्यासाठीं पांच माणसांना वीस रुपये भाडें ठरवून संध्याकाळींच पुढें निघालों. वाटेंत चार मैलांवर वेंकटापूर येथें थोडा फराळ-पाणी करून निघालों व ता. १४ ला सकाळीं ९-१० चे सुमारास पेदच्यूर येथें पोहोंचलों.

पेदच्यूर येथें पाण्याचा मोठा तलाव आहे, त्यांतून पाणी आणून चावीनें धर्मशाळा (झाडांच्या फांद्या व पानें यांचे मंडप) आहेत, तेथें तें लोकांनीं घ्यावयाचें. बाकी कोठूनही तलावांत शिरण्याची सोय नसते. पोलीस–बंदोबस्त बराच असतो. एक विहीर आहे. आम्हीं प्रातर्विधी व फराळ आटोपून लगेच हमाल ठरविला व डोंगर चढण्यास पायीं आरंभ केला. यात्रा बरीच होती. वर ऊन व आजूबाजूस डोंगर झाडी. मधूनमधून पाणी मिळण्याची सोय होती. डोल्या व घोडी १५ ते २५ रुपये माणशीं. सात आठ मैल चढउतर करीत भीमनकोळ्ळ म्हणून एक ठिकाण आहे, तेथवर गेलों. पुढें तीन मैल खडी चढण आहे. मी कसातरी कष्टानें चढून गेलों; पण नाईक मागें राहिले व तेवढ्या अंतराला त्यांना १५ रुपये देऊन डोली करावी लागली व संध्याकाळपर्यंत एकदां देवळाजवळ पोहोंचलों. वाटेंत दोन ठिकाणीं टोंचण्यासाठीं तपासणी असते. असो.

धूळ-दर्शन घेण्यासाठीं देवळांत गेलों. दर्शनाचा पास घेतला व देवदर्शन घेऊन आलों. तिकडील ब्राम्हणाच्या खानावळींत सार-भाताचें जेवण घेतलें व देवळाच्या बाह्य तटाशेजारीं थोड्या जागेंत पडलों. बुधवारीं (ता. १५) प्रातर्विधी आटोपून एका तळ्याच्या कांठावर स्नानें करून मोठ्या कष्टानें अगदीं मारामारींत ३-४ तास काढून देवदर्शन घेतलें, बेल-फुलें वाहिलीं व दुसऱ्या दारांतून बाहेर पडलों. पासावर दोन वेळांच दर्शन होतें. गुरुवारीं पारणें सोडलें. रात्रीपासूनच गर्दी ओसरूं लागली होती. पाय दोन दिवस दुखतच होते.

पाताळ-गंगा नांवाचें ठिकाण येथून ३-४ मैल डोंगरांत आहे, तेथें जाणें झालें नाहीं. जिकडेतिकडे डोंगरच डोंगर! देवळांत-सुद्धा पाण्याचे हौद वगैरे आहेत; पण स्वच्छतेचें महत्त्व न

समजणारे यात्रेकरू फार, त्यामुळें बंदोबस्तांतसुद्धां पाणी घाण करतात. तिकडील पद्धतीचे शौचकूप व पलीकडे जरा दूर न जातां देवळाच्या आसपास वाटेल तेथें घाण करतात. असो. ओझें वाहणारीं गाढवें व भिल्लांसारखे रांकट लोक आहेत. रु. ५-१०-१५ वाटेल तेवढे पैसे ते बोजाला मागतात ! यात्रा परत जाणेसाठीं आतुर झालेली; एकमेकांची भाषा समजत नाहीं ! अशांत कमी-जास्ती पैसे द्यावेत अगर आपणच बोजे बरोबर न्यावेत.

एका माणसाच्या साधारण भारी ओझ्यासाठीं पांच रुपये ठरवून शुक्रवार (ता. १७) पहाटे परत निघण्याचें ठरविलें. १-२ वाजल्यापासूनच लोकांची गडबड सुरू झाली व हमाल-हमाल असा सारखा आवाज सुरू झाला. यात्रा परततेवेळीं हे हमाल व डोलीवाले आपले दर फारच चढवितात. ठरवलेला हमाल जास्त पैसे मिळतील तिकडे जातो. एक लहान वळकटी व एक पडशी याला आम्हीं चार रुपये ठरवून नवाच हमाल घेऊन पहाटे ५॥ वाजतां डोंगर उतरणेस निघालों. पहिली व अत्यंत कठीण उतरण ३-४ मैलांवर भीमनकोळ्ळ येथें संपते. हुषारीनें उतरण्यास आम्हांस दोन तास लागले. चहा वगैरे घेऊन जरा टेकलों व चढउतर करीत दुपारीं बाराचे सुमारास एकदांचे पेदच्चूर गांठलें.

गर्दी तर मी म्हणत होती. गाड्याहि बऱ्याच होत्या; परंतु आत्मकूरपर्यंत पांच माणसांना २५ रुपये असें भाडें मागूं लागले. आम्हीं एका .विहिरीजवळ कसल्यातरी जागेंत उतरलों व सोंवळेंओवळें न म्हणतां मिळेल तें पाणी घेऊन स्नान केलें व रंगोपंतांनीं तयार केलेला भात-झुणका खाऊन एक गाडी ठरविली. तासभर विश्रांती घेऊन गाडीवाल्याचा तपास करतां दुसरेंच एक जास्तीचें भाडें ठरवून तो जाऊं लागला होता. हिरेमठ नांवाच्या

आमच्या ग्रूपमधल्या लिंगायतांनीं धडपड करून त्याला गांठलें व जरा दमदाटी केल्यावर दुसरी गाडी आमचेकडे पाठवून पहिल्यानें तोंड चुकविलें. आम्हीं पांच जण गाडींत बसलों, पण नवा गाडीवाला करारापेक्षां जास्त पैसे मागूं लागला. ('निदान २५ रु. व मेट्टा = कर सुमारें २।। रु. तुम्हीं द्या,' असें आपल्या भाषेंत तो सांगूं लागला.) एकमेकांना भाषा समजत नाहीं; त्यामुळें फार त्रास होतो.

अखेर पोलिसकडे देण्याची भाषा सुरू झाल्यावर तो गाडी-वाला नरमला व गाडी हांकण्यास तयार झाला व आम्हीं रात्रीं सात वाजतां पेदच्यूर सोडलें. पूर्ण काळोख व उशीरां एकच गाडी निघालेली, तेव्हां न जाणें बरें अशा तऱ्हेचें तो गाडीवाला वाटेंत सांगूं लागला; पण आपलें कांहीं चालूं देणारीं हीं माणसें नव्हेत, अशी खात्री झाल्यांवर सुमारें मध्यरात्रीपर्यंत सारखी गाडी चालली. आमचा डोळा लागलेला बघून रात्रीं १२–१ चे दरम्यान भर जंगलांत दुसरी एक गाडी होती, तेथें ही गाडी उभी करून गाडीवाला २–३ तास स्वस्थ झोंपला. पण गाड्यांची ये-जा सुरू असल्यानें आम्हीं जागे झालों व गाडीवानास गाडी पुढें हांकणेस भाग पाडलें. जनावरेंहि रेंगाळत चाललीं व ता. १८ रोजीं शनि-वारीं दुपारीं १२ चे सुमारास आम्हीं आत्मकूर स्टँडवर आलों.

वाटेंत सर्व जंगल भुरटें असून पशुपक्षिरहित दिसलें. कार-वार जिल्ह्यांतील जंगलाचे मानानें जंगल लहानच, पण ३५-३७ मैल डोंगर, कडे, झाडी, धूळ व दगड हेंच दृश्य एकसारखें दिसत होतें. आत्मकूरला गाडींतून उतरून गाडीचें भाडें देईपर्यंत नंद्याळची बस् तयार झाली व आम्हीं आंत शिरून जागा धरल्या व दोन तासांत ३३ मैल आलों. लगेंच आठ आणे सीटचा टांगा मिळाला व आम्हीं सुमारें दोन वाजतां नंद्याळ स्टेशनवर पोहोंचलों.

दुपारची गाडी गेली होती व पुनः रात्रीं तीन वाजतां दुसरी निघण्याची म्हणून नळावर स्नान केलें व फराळ ( दुकानांत मिळेल तो ) करून वेटिंग रूम व आसपास पडून राहिलों. रात्रीं रेल्वेच्या खाणावळींत रेशन प्लेटसारखें जेवण करून प्लॅटफॉर्म-वर झोंपलों.

पहाटे दोन वाजतां स्टेशनचें आवार यात्रेकरूंनीं फुलून निघालें होतें. मोठ्या त्रासानें हुबळीपर्यंतचीं तिकिटें काढलीं. गाडी १॥ तास उशीरां आली; अंत शिरणें अगदींच कठीण झालें व एकदांचें नंद्याळ स्टेशन सुटलें. कांहीं नादुरुस्तीमुळें अगदी कमी वेगानें गाडी जात जात १९-२-५० ला दुपारीं बारा वाजतां गुंट-कल स्टेशनवर आली. पण हुबळीचे गाडीचें कनेक्शन चुकलें.

या बाजूस यरगुंटा स्लॅब्सचा व्यापार चांगला चालत असावा. दुपारचे वेळीं गुंटकलसारख्या जंक्शन स्टेशनवरसुद्धा पाण्याचे फार हाल ! मी रेल्वेच्या खानावळींत जेवण केलें व प्लॅटफॉर्मवर पर-तलों. रंगोपंतांना जेवण मिळालें नाहीं. संध्याकाळीं ७–३० च्या गाडीनें हुबळीस निघालों व रात्रभर प्रवास करून ता. २०-२-५० ला पहाटे पांच वाजतां हुबळीस उतरलों. चहा वगैरे आटोपून पुण्याकडे जाणाऱ्या गाडींत बसलों. तिकिटें काढलीं होतींच. सकाळीं सातच्या सुमारास गाडी सुटली व बारा वाजतां परत आम्हीं बेळगांवीं आलों.

# केदारनाथ

ज्योतिर्लिंगांपैकीं ११ चें दर्शन घडलें, पण अत्यंत अवघड अशा गणल्या गेलेल्या केदारनाथाचें दर्शन घडतें कीं नाहीं, असें मला झालें होतें ! शक्तीचें मान कमी होऊं लागलें; त्यामुळें जरा जास्तच अधीरपणा आला. सोबतीसाठीं प्रयत्न पुष्कळ केला, पण अखेर रंगराव नाईक व मी असे दोघेच निघालों. ता. ११ मे १९५१ रोजीं श्री राजेंद्रबाबू (राष्ट्राध्यक्ष) च्या हस्तें सौराष्ट्रांत श्रीसोमनाथाची प्राणप्रतिष्ठा होणार असें नक्की जाहीर झालें होतें व त्याच दिवशीं श्रीबद्रीनारायणाचे दरवाजे उघडावयाचे, असें वर्तमानपत्रांतून वाचलें होतें, म्हणून तोच शुभ मुहूर्त मानून शुक्रवार ता. ११ मे ५१ रोजीं सकाळीं ६-५५ वाजतां बेळगांव-हून रेल्वेनें निघालों. पुण्यास रात्रीं गाडी बदलून सकाळीं (ता. १२) ठाण्यास आलों. ता. १३ रोजीं चि. अण्णाकडे वार्षिक सत्य-नारायण-पूजा होती, तेथें जेवणास गेलों होतों; त्यामुळें पुन: ठाण्यास येऊन व्यवस्था करून सोमवार ता. १४ रोजीं संध्याकाळीं दादरवर गाडी बदलून बी. बी. सी. आय्. रेल्वेच्या बाँबे सेंट्रल स्टेशनवर आलों व रात्रीं ९-३० वाजतां मीरत एक्स्प्रेसनें (दिल्लीवरून) हरिद्वारास निघालों. या गाडीचें तिकीट मेल व साधी पॅसेंजर असें होतें.

वाटेंत सुरत, बडोदा, गोध्रा, रतलाम, कोटा वगैरे स्टेशनें घेत एकदांची ता. १६ रोजीं सकाळीं आठ वाजतां ( लेट )

आमची गाडी दिल्लीच्या स्टेशनवर आली. आम्हीं संध्याकाळ-पर्यंत दिल्लींत विश्रांतीसाठीं थांबलों. हमाल करून लक्ष्मीनारायण-धर्मशाळेंत गेलों. विहिरीवर स्नानें करून जवळच असलेल्या कृष्ण-भोजनालयांत जेवणें घेऊन झोंप घेतली व संध्याकाळीं पुनः स्टेशनवर आलों. तिकिटें होतींच. गाडीचा तपास करून वेळींच जागा धरून बसलों. रात्रीं ८-२५ ला गाडी सुरू झाली. गर्दी फार होती. सारी रात्र बसूनच काढली व ता. १७ ला सकाळीं ६ चे सुमारास हरिद्वार स्टेशनवर पोहोंचलों. टांगा करून गांवांत गेलों. ९ चे सुमारास पं. बाबूशास्त्री यांचे पाठशाळेंत सामान ठेवून रामभरोसे मोटवाल नांवाचे बद्रिनारायणाचे पंडे ( मला पूर्वीं बेळगांव येथें भेटलेले ) यांना निरोप पाठविला. गंगा-स्नान करून भोजनालयांत जेवण करून विश्रांती घेतली.

सायंकाळीं गंगाकांठीं फिरून ब्रम्ह-कुंडाजवळ गंगेची आरती वगैरे पाहून परत पाठशाळेंत आलों. ता. १८ ला सकाळींच दुसरे नवे यात्रेकरू आल्यानें आम्हीं मोकळ्या जागेंत सामान हलविलें व स्नानें व जेवणें आटोपून जरा वेळानें मोटवाल पंड्यांनीं आण-लेल्या मनुष्याशीं करार ठरवून सबंध यात्रा संपवून परत आण-ल्यास दोघांत मिळून रोख ८० रुपये देण्याचा ठराव केला आणि लगेंच मोटारचीं तिकिटें खरीदून ऋषीकेश येथें आलों.दीनदयाळ-- आमचा नोकर- हरेक बाबतींत आम्हांस मदत करून आमचेबरोबर असावा, असा करार होता. वाटखर्चास त्याला ४० रुपयांपर्यंत द्यावयाचे; बाकीचे ४० परत हरिद्वारास आल्यावर द्यावयाचे. तो क्षत्रिय जातीचा व आमचीं भांडीं वगैरे घासणें करीत असे, म्हणून उरेल तें अन्न आम्ही त्याला देत असूं. पण जेवण देण्याचा करार नव्हता.

देवप्रयागला जाणाऱ्या मोटारीचीं तिकिटें रिझर्व्ह करण्यासाठीं मी लक्ष्मण झूला येथें गेलों व नाईक यांनीं बाबा काळी कमळीवाल्याचे धर्मशाळेंत एक खोली तीन दिवस राहण्यासाठीं मिळविली. मोटारचीं तिकिटें ऋषीकेश येथेंच मिळतात, म्हणून मी परत आलों व नांवें नोंदवून २०-५-५१ ला तिकिटें मिळण्याचें आश्वासन घेऊन परत आलों. यात्रेकरू फार होते. रात्रीं हॉटेलमध्यें जेऊन येऊन निजलों. ता. १९-५-५१ ला गंगेंत स्नानें करून जेवणें आटोपलीं व संध्याकाळीं तीन मैल टांगा करून पुन: ( काशी–यात्रेच्या वेळीं एकदां सर्व पाहिलें होतें ) लक्ष्मण झूला व स्वर्गाश्रम पाहून परत गंगापार नावेंतूत येऊन चालत ऋषिकेशला आलों. ता. २० रोजीं सकाळीं सात वाजण्यापूर्वीं मोटारस्टँडवर सुमारें ५०० लोक होते. नोंदलेल्या नांवांच्या लोकांना पुकारलें, पण आमच्या नंबरापर्यंत पाळी आली नाहीं. पण दुसऱ्या कांहींना १-२ सीटवाल्यांना तिकिटें दिलीं, त्यांतच मी आमचीं ३ तिकिटें म्हणून नंबर सांगितला. लगेंच माणशीं एक आणा फी देऊन चिठी घेतली न दोन अप्पर व एक लोअर अशीं तिकिटें मागितलीं; पण तीनही लोअरच मिळालीं व ८-२० वाजतां ७५ नंबरच्या मोटारींत बसलों व प्रवासाला खरी सुरवात झाली.

गंगानदीच्या तीरावरून वळणें घेत घेत खडा पहाड चढत रस्ता काटावयाचा. वाटेंत दोन तीन ठिकाणीं मोटार उभी करून विश्रांती घेतात. बहुतेक सर्व हिमालयांत अशा ठिकाणीं व चट्टीवर चहा मिळतो. आपलेकडील अरबैल घाट अगर गोव्यांत जातांनाच्या प्रवासावरून थोडीशी रस्त्याची कल्पना येईल. मोटार लागूं नये म्हणून सुंठ, आलें, लवंगा वगैरे बरोबर असाव्यात. असो. दुपारीं एकचे सुमारास देवप्रयाग येथें आलों. येथें गंगा व अलकनंदा यांचा

संगम आहे. नदीच्या दोन्ही बाजूंस घरें करून लोक राहतात. ऋषीकेशपासून १-१।। मैलावरच तेहरी-गढवालची हद्द सुरू होते. तेथें रामभरोसे पंड्यांचा मुलगा पुरुषोत्तम नांवाचा होता, त्याला भेटून श्राद्ध वगैरेबद्दल बोलणें करून सामान आणून स्वयंपाक-भोजनें केलीं. संध्याकाळीं श्रीमत् शंकराचार्यांचें राममंदिर (संगमावर आहे) तेथें गेलों. एकंदर दृश्य बरें वाटलें. ता. २१ ला सकाळीं पुरुषोत्तम पंडा आला. आम्हीं संगमावर गंगाभेट, श्राद्धें, पिंड सर्व आटोपलें. काम करणारा पंडा साधारणच होता. पण पंड्यांच्या जन्मजात स्वभावाप्रमाणें लोभी होता. आमचेकडून कांहींही करून पैसे काढावयाचे ! असो. कार्य आटोपून जेवणें केलीं व स्टँडवर आलों. कीर्तिनगरचीं मोटारचीं तिकिटें काढलीं व सुमारें साडे पांच वाजतां निघालों.

गंगातीरानें पूर्ववत् मोटार चालली व रात्रीं सात वाजतां कीर्तिनगरला पोहोंचलों. लगेंच ३ मैल पायीं चालून श्रीनगर येथें बाबा काळी कमळीवाले यांच्या धर्मशाळेंत मुक्काम केला. गर्दी बरीच होती. पहाटेस उठून सर्व आटोपून सात वाजण्यापूर्वीं मोटार-स्टँडवर आलों. नांवें रात्रीं नोंदविलीं होतीं. पण पहिल्या मोटारी भरल्या, पण दहा वाजतां आम्हीं मोटारींतून निघालों व १२ वाजतां रुद्रप्रयाग येथें पोहोंचलों. ( ता. २२-५-५१ ) येथें गंगा व मंदाकिनी यांचा संगम आहे. १०-१२ पायऱ्यांवरील देवीचें मंदिर पाहून १५ पायऱ्यांवरचें श्रीरुद्रदेवाचें मंदिर पाहिलें व एक पाठशाळा लोकांच्या मदतीवर चालल्याचें तेथें बसलेल्या संन्याशीबुवानें सांगितलें. स्नानें-जेवणें आटोपून विश्रांती केली व व पहाटे पांच वाजतां सामान आवरून पायीं प्रवासास सुरवात केली. येथून केदारनाथाकडे एक व चमोलीवरून बद्रिनाथाकडे एक अशा वाटा फुटतात.

या बाजूस फार लवकर उजाडतें. सप्तर्षींचे तारे जवळ-जवळ डोक्यावरच दिसतात. सकाळीं आठ वाजतां छकोली चट्टीस पोहोंचलों. वेळ बराच होता म्हणून पुढें दोन मैलांवर रामपूर येथें येऊन जेवणें वगैरे आटोपलीं. सबंध वाट पहाडांतून चढउतारानें गंगाकांठानेंच आहे. जंगल फारसें मोठें नव्हे, पण टेकड्या व सुरूचीं झाडें फार आहेत. कांहीं ठिकाणींच दाट जंगल आहे. पाणी विपुल आहे. मुद्दाम लावलेल्या केळी, तमाखू व रेघोट्या मारल्यासारखीं शेतें कांहीं ठिकाणीं दिसतात. अशा ठिकाणीं गढवाली स्त्री, पुरुष व मुलें ३-४ घरें करून शेतीवर राहतात व जाणाऱ्यायेणाऱ्यांकडे ' पै पैसा ' मागतात, 'सुवा धागा' मागतात. कांबळ्याचीं ठिगळें जोडलेले कपडे बहुतेक लोक वापरतात. पण बहुतेक सर्वांपाशीं नम्रता वास करते. असो.

संध्याकाळीं अगस्ति मुनी चट्टींत मुक्काम केला. ता. २४ ला पहाटे उठून चालूं लागलों. चंदावती चट्टीचे अलीकडे ४ फर्लांगांवर आदिकेदार अथवा बांसकेदार म्हणून श्री शंकराचार्यांनीं स्थापना केलेल्या श्री शंकराच्या पादुका गंगेंत एका स्तूपासारख्या जागीं दाखवितात व मदतीची अपेक्षा करतात. वर्गणी देऊन नांवें नोंदवून पावत्या घेण्याबद्दल संन्यासी सांगत असतात. इकडे गंगेच्या लहान लहान प्रवाहांवर ( फाटे ) दळण्याच्या चक्क्या बसविल्या आहेत. त्या गोकाक फॉल्स् येथील टरबाईनच्या धर्तीवर आहेत. लांकडी अगर पत्र्याची यांत्रिक योजना करून पाण्याच्या प्रवाहाच्या जोरानें जाती भराभर फिरतात. गहूं व कणीक केसाळ बकरे वाहून नेतात. खेचरेंहि वाहतुकीसाठीं उपयोजितात.

श्रीकेदारेश्वराचे डोंगर-माथ्याचें दर्शन येथूनच होऊं लागतें.

वर पडलेलें बर्फ ऊन पडून चकाकूं लागलें म्हणजे फारच मनोहर दिसतें. येथून थंडीचा प्रदेश सुरू होतो. चढावही बराच आहे. रात्रीं कुंड चट्टीस येऊन मुक्काम केला ता. २५ ला सकाळींच उठून दोन मैलांचा चढाव चढून गुप्त काशीस आलों. थंडी व पंडे फारच त्रास देतात. येथें श्रीकाशीविश्वनाथ हें मुख्य दैवत असून त्याच्यासमोर एक कुंड आहे. त्यांत एक पैसा देऊन स्नानास सोडतात. गोमुखांतून दोन पाण्याच्या धारा ( गंगा-यमुना ) कुंडांत पडतात, त्याला मनकर्णिका म्हणतात. प्रत्येक धारेखालीं स्नान-संकल्पासाठीं एक एक पैसा घेतात. देव-दर्शनाला थोडीं थोडीं माणसें सोडतात. शेजारींच एक गौरी-शंकराचें देवालय आहे. श्रीशंकर नंदीवर बसलेले, अशी पांढऱ्या काश्मिरी दगडाची मूर्ती बरी आहे. दुपारीं चार वाजतां पुढें निघालों व ता. २५ ला रात्रीं व्युंग चट्टींत मुक्काम व जेवण केलें.

ता. २६ ला शनिवारीं मारुति-दर्शन घेऊन निघालों; तोंपर्यंत रंगोपंतांना, चढाव मोठा आहे, असें सांगून दीनदयाळनें घोडा ठरविण्यासाठीं सांगितलें. तपास करतां मैलाला सव्वा रुपयाप्रमाणें रंगाण्णांचा देह बघून मागूं लागले; म्हणून फाटा चट्टीपर्यंत कसें तरी आलों. रंगाण्णा अगदीच थकल्याचें दिसूं लागले, म्हणून ते अर्ध्या मैलाला आठ आणेप्रमाणें कंडी करून बसून बदलपूर चट्टीस आले व डोक्यावर पांघरूण घेऊन निजले; जेवले नाहींत. त्यांचेकरितां दोन रुपयास घोडा ठरवून आम्हीं रामपूर चट्टीस आलों. ‘मी चालू शकतों, जरूर तेथें वाहन करीन. तुम्हीं घोड्यावरून जा’ असें सांगितलें; पण त्यांना पटेना व अखेर दोन घोडे मैलीं एक रुपयाप्रमाणें केदारनाथ करून परत नाला चट्टीस येण्याच्या करारानें ठरविले व चौधरीपाशीं

करार नोंदविला.

ता. २७ ला सकाळींच घोडयावरून निघालों व त्रिजुगी नारायण येथें कुंडांत मार्जन-स्नान करून लक्ष्मीनारायणाचें दर्शन घेऊन निघालों. आतां गर्द झाडी व थंडी जोराची सुरू झाली. वाटेनें घोडयाची व स्वाराची परीक्षाच ! अखेर गौरीकुंड चट्टीस आलों. गंगेचें पाणी बर्फासारखें गार; तर १०-१५ फुटांवरच ऊन पाण्याचें कुंड आहे. अत्यंत आश्चर्याची गोष्ट ! पाणी ठिक-ठिकाणीं असून बर्फहि गंगेंत व डोंगरांत पडलेलें सारखें दिसतें. जेवणें आटोपून पुढें रामबाडा चट्टीस ( उंची ८००० फूट ) केदारनाथाचे अलीकडे चार मैलांवर वस्ती केली. ता. २८ ला सकाळीं निघून श्रीकेदारनाथास गेलों. बर्फमय गंगेंत स्नान केलें (शरीर बधीरच होतें) व संध्या करून बेल-फुलें विकत घेऊन बारीं-तून श्रीकेदारेश्वराचें दर्शन घेतलें. श्रीची पिंडी त्रिकोनी दगडाची असून त्याला खूप तूप चोपडतात. दिव्याचा प्रकाश मिणमिणीत असतो. अभिषेकाला पैसे बाहेर भरावयाचे असतात. ५१–१०१ रुपये वगैरे.

पूजा आटोपून दुसऱ्या दारानें बाहेर पडलों. पंडे लोक कोट विजारी घालून पूजा करतात. उघडीप होती, तेव्हां ८-९ पंडे पोथ्यांवरून कांहींतरी म्हणत बाहेर ओळीनें बसले होते. वस्ती फार नाहीं व ३-४ लहान देवळें आहेत. एका देवळांत उदक–कुंड आहे. त्यांतलें पाणी प्यायल्यानें पुनर्जन्म नाहीं म्हणतात. आम्हीं जेवणाची भानगड न करतां पुरी-भाजी घेऊन फराळ केला व बारा वाजतां परत निघालों. थंडी फार म्हणून शक्यतों दूर जाण्याचा बेत केला व ११ मैलांवर रामपूर चट्टीस येऊन जेवण व वस्ती केली. ता. २९ ला सकाळीं निघून ब्युंग चट्टीस जेवणासाठीं

दोन तास काढले व पुनः तीनचे सुमारास निघून नाला चट्टीस आलों व कराराप्रमाणें घोडेवाल्यांचे पैसे देऊन करार-चिठ्या फाडून टाकल्या व चहा घेऊन पुढें निघालों. येथूनच श्रीबद्रिनारायणाचा वेगळा रस्ता लागतो.

## बद्रिनारायण

तीन मैल पुढें आल्यावर उखीमठ चट्टीला आलों. रंगाण्णा थकले व एक मैल घोडा करून आले. रात्रींपूर्वी येथील गट्टी वगैरे ३-४ लहान देवळें पाहिलीं. रंगोपंतांस रात्रीं ताप आला. सकाळीं दोन कंड्या (करंडी शब्दाचा अपभ्रंश) श्रीबद्रिनारायणा-पर्यंत करार करून निघालों. (घोड्यावर बसण्याचा मला त्रास झाला होता, म्हणून कंडीचा उपयोग केला. ) जवळजवळ ६-७ मैल खडी चढण चढून गवळीया बगड चट्टीस जेवणास आलों. येथून बर्फमय शिखरें असलेली एक रांगच रांग पर्वताच्या एका कडेला दिसते. ५०-७५ फूट उंचीचीं झाडें, तुटलेले कडे व पाण्याचे ओघ हें दृश्य कांहीं वेळ पाहण्यास मजा वाटते. पुढें बैंयान कुंड चट्टीस रात्रीं वस्तीस गेलों. ता. ३० ला सकाळीं निघण्याचे वेळीं 'तुंगनाथ न बघतांच सरळ मार्ग धरावा,' असें आमचेबरोबरचा हमाल ( पंड्यानें दिलेला ) सांगूं लागला; पण मी दर्शन घेऊन पुढें जाण्याचें ठरविलें.

चढण दांडगी, कंडीवालेसुद्धा थकले व धुकें व पाऊस एकदम सुरू झाला व सगळीकडे हवा वाईट झाली. कसे तरी वर पोहोंचलों. थंडी जोरांत सुरू झाली. धर्मशाळेंत पोहोंचलों, तोंच एक पंडा येऊन आम्हांस शेगडी पेटवून देऊन चहा आणून देऊन आमचे उपाध्येपणासाठीं सारखा कष्ट करूं लागला. 'आम्हीं दर्शनासाठीं आलों' असें सांगितलें, तरी ऐकेना. पुरी-भाजी-चहा-वर भागवून धुमीपाशी शेकत बसलों. दुपारीं ३ चे सुमारास

श्रीतुंगनाथाचे देवळांत गेलों. मुख्य तुंगनाथाचें दगडी लिंग व तेथेंच मांडलेल्या रुप्याच्या पंच केदारांच्या प्रतिमा पाहून संकल्प वगैरे आटोपून पंड्याची संभावना भागविली व पुन: पाऊस सुरू झाला म्हणून धर्मशाळेंत आलों. पाऊस, निसरड व चिखल म्हणून कंडीवाले कुरकुरूं लागले. आम्हीं रात्रीं पांघरुणें भाड्यानें घेऊन रात्र घालविली. तुंगनाथ एका तुटलेल्या डोंगरकपारीचे माथ्या-वर आहे. चट्टीप्रमाणें चार झोपड्या, धर्मशाळा, एक देऊळ व दोन धारा पडणारें पाण्याचें लहान कुंड इतकेंच. पाऊस दिवसां-तून एकदां तरी त्या भागांत पडतोच म्हणतात. डोंगराच्या या भागावर झाडझुडूप मुळींच नाहीं. अगदीं बोडके कडे आहेत ( कदाचित् बर्फ पडण्यामुळें असावें. )

कशी तरी रात्र काढून सकाळीं ( १-६-५१ ) निघालों व दुपारीं मंडल चट्टीस जेवणें करून रात्रीं आठ वाजतां गोपेश्वर येथें आलों. श्री (महादेव) गोपेश्वराचें दर्शन घेऊन रात्रीं दूध पिऊन निजलों. थंडी मुळींच नव्हती. घोड्यावरून जाण्याची, कंडींतून जाण्याची व जेवणाच्या अवेळीपणाची उष्णता आज जरा जाणवली व मूळव्याधीच्या कात्र्यांतून होणाऱ्या त्रासाची जाणीव झाली. आज अर्धा शेर दूध घेतलें. या रस्त्याला कंडीवाले, हमाल, घोडे वगैरे जरूर तेथें मिळूं शकतात. एकंदर प्रवासांत माशा फार त्रास देतात व त्याबद्दल जागोजाग इशारे लिहिलेले आहेत. प्रत्येक चट्टीस टट्टीघर व पेशाबघर (गोणपाटाचें) तयार बांधलेलें असतें. त्याचा उपयोग करा, असा इशाराहि दिलेला असतो. पाणी कोणतें प्यावें, हेंसुद्धां लिहून ठेवलेलें (दगडावर) आहे. ता. २ ला निघून चमोली मुक्कामावर आलों. तेथें कॉलरा-इंजेक्शनसाठीं तपासणी असते. हमाल लोक चुकविण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या कंडीवाल्यांना व हमालांना येथें टोचलें. अलकनंदे-शेजारींच गांव असून मोटार-स्टँड एका तीरावर आहे. फक्त बद्रिनारायण करणारे यात्रेकरू श्रीनगरहून मोटारीनें येथें येतात. आम्हांलासुद्धा परत जातांना येथें येऊनच मोटारमार्गें श्रीनगरला जावयाचें आहे. पुनः इकडे बोडके डोंगर सुरू झाले. पायरस्ता अलकनंदेच्या दुसऱ्या तीरावरून जातो.

सुमारें ९-३० वाजतां छिणका चट्टीस आलों. स्नानें-भोजनें करून दुपारीं २-३० वाजतां पुढें निघालों. दोन मैलांवर बिरय-गंगा (विरहगंगा कदाचित्) अलकनंदा संगमावर आलों; तों एकदम हवेंत बदल झाला व पाऊस सुरू झाला. आठ वाजणेचे सुमारास आम्ही पीपला कोटी येथें पोहोंचलों व धर्मशाळेंत पडण्यापुरती जागा मिळविली. येथें ५-६ मोठीं दुकानें असून चवऱ्या, गंगावनें, हरिणाचीं व वाघाचीं कातडीं, कस्तुरी व शिला-जित् बऱ्यापैकीं विकलीं जातात, असें म्हणतात. ' पण बद्रिनाथाला जाऊन परत येतांना तुम्ही खरेदी करा, ' असें दुकानदारानेंच सांगि-तलें. रात्रीं एका कंडीवाल्याला (इंजेक्शनचा) ताप आला. त्यानें टांगणी चट्टीपर्यंत एक घोडा करून रंगोपंतास पुढें पाठविलें. ता. ३ ला टांगणी चट्टीस जेवण करून रात्रीं गुलाबकोटीस आलों. जाग्यासाठीं शिधा घेतला व रोटया व पिठलें बनवून रात्र भागविली. येथें पाताळ गंगा पण दिसते.

सोमवार ता. ४ रोजीं जोशी मठास आलों. चट्टी मोठी असून देवळांत श्रीनरसिंह व भगवान विष्णूची उभी मूर्ती आहे. ऑक्टोबरनंतर ६ महिनेपर्यंत श्रीबद्रिनारायणाची पूजा येथेंच होते. (वर बर्फ असतें म्हणून) चमोलीपासून जोशी मठापर्यंत मोटार-रस्ता आंखून तयार आहे. कदाचित् चार पांच वर्षांत सुरू होईल.

दुपारीं पुढें निघालों व विष्णुप्रयागवरून ( अलकनंदा व मंदाकिनी यांचा संगम ) वस्तीला घाट चट्टीस आलों. ता. ५ ला पुढें निघालों व हनुमान चट्टीस फराळ उरकून पावसाच्या भीतीनें पांच मैल घोडदौडीनें श्रीबद्रिनाथ गांठलें. आमचा हमाल दीनदयाळ हा चालत पुढें झाला होता. त्यानें रामभरोसे यांचे घरीं जाऊन वर्दी दिली व पुरुषोत्तम नांवाचा पंड्याचा मुलगा व तो मिळून आम्हांस घरीं घेऊन गेले. वस्ती चांगलीच असून बाजार व घरेंही बरींच आहेत. आनंदाची व आश्चर्याची गोष्ट म्हणजे ह. भ. प. श्री. कोल्हटकर बुवा ( कीर्तनकेसरी ) हेही त्याच पंड्याकडे होते, ते भेटले. मी त्यांना ताबडतोब ओळखलें. दुसरी एक गोष्ट म्हणजे आम्हीं गेल्यापासून पाऊस नव्हता. दुसरे व तिसरे दिवशींच्या कार्यक्रमासंबंधी माहिती पंड्याच्या मुलापेक्षां बुवांनींच आम्हांस सांगितली. आमच्या खोलींत खालीं गालीचे, वर दोन रजया, शेकण्यासाठीं लाकडाच्या तासलेल्या ढलप्या व तप्तकुंडांतील बारडीभर पाणी, इतकें दीनदयाळनें तयार ठेविलें होतें. ( तो त्यांच्या तर्फेचा आमची नोकरी करणारा ). दूध बारा आणे पावशेरसुद्धां मिळालें नाहीं. थंडी सुरू झाली. मी थोडा फराळ करून चहा घेऊन निजलों. बरेच दिवसांत चांगली झोंप नव्हती, ती मिळाली व सकाळीं हुषारी वाटली. पूर्वी काशी-रामेश्वर यात्रेमध्यें आमच्या उपाध्याबरोबर कामासंबंधीं करार करून जातांना सर्व रक्कम चुकती करीत असूं. त्याप्रमाणें या पंड्याला विचारलें, तर त्याला समजेना; म्हणून बुवांचे मार्फत सांगितलें तर ' सांगलीच्या वेलणकरांसारखी खोली बांधून द्या ' असें वेड्यासारखें उत्तर मिळालें. आपण काम काय करणार व कोणाकडे काय मागावें, हेंसुद्धा पंडे लोकांना कळत नाहीं. मारवाडी, किसान, गुजर वगैरे उत्तर हिंदुस्थानचेच धनिक यात्री फार

असतात, त्यामुळें सर्वच शेट लोकं, असे या बाजूचे लोक समजत असावेत. शक्य तेवढ्या प्रयत्नानें यात्रेकरूकडून पैसा ओढावा, हा त्यांचा एकच विचार दिसतो.

ता. ६ रोजीं सकाळीं पंड्याबरोबर तप्त कुंडावर स्नानास गेलों. एका लहान ताटलींत दोन मुठी तांदूळ, एका वाळलेल्या खोबऱ्याचा गोटा घेऊन संकल्प सांगण्याबाबत सव्वा रुपया ठरला होता (प्रत्येकीं). तरीपण बाजारी सामान एक रुपयाचें घेववून वस्त्राबद्दल घोटाळा घालूं लागला. देवप्रयाग येथेंच त्याची परीक्षा झाली होती; तरी पण आम्हीं दोन दोन रुपये दिले व ऊन पाण्याचीं स्नानें केलीं. जरा बरें वाटलें. नंतर तूप, खोबऱ्याच्या काती, बेदाणा, डाळ वगैरे मिसळ नारायणाला भोग म्हणून घेऊन जाऊन देव-दर्शन घेतलें. देवळांत पंडे लोकांना देवापर्यंत प्रवेश नाहीं. यात्रेकरूंबरोबर ते नुसते असतात. आम्हीं दर्शन घेऊन प्रसाद ( नेलेल्या मिसळीचा ) घेऊन बिऱ्हाडांत आलों. कांहीं वेळानें पिंडदान करण्यासाठीं ब्रम्हकपालाकडे निघालों. येथेंसुद्धा चालविणारे पंडे वेगळेच असतात, म्हणजे आमचे पंडे नुसतें मार्ग-दर्शनच करतात. जातांना फुलें, तुळशी, गंध व पिंडांकरितां भाताच्या चकत्या, हे जिन्नस तयार मिळतात व तेच घ्यावयाचे, असें सांगतात. सर्व घेऊन आम्हीं ब्रम्हकपालावर बसलों. आमचा पंडा तेथील इसमापाशी आम्हांस बसवून परत गेला. २०-२५ इसमांचें कृत्यसुद्धा एक मनुष्य उरकतो व अशा सर्वांचें झालेल्या कृत्यांतून फल-प्राप्ती काय होत असेल, हें तेथें प्रत्यक्षच पहावें. आमच्यापूर्वीचे लोक उठले व आम्हीं ३ इसमच कृत्य करण्यास बसलों पिंडदान झालें व दक्षिणेचें अडलें. सव्वा रुपयानें समाधान झालें नाहीं. अखेर दोन रुपये दिले, तरी पंड्याची हांव भागेना! अखेर नमस्कार, पिंड उचलणेंपर्यंत आलें, मग पैसे घेऊन परवानगी

मिळाली. ते घेऊन तर्पण करणाऱ्याकडे गेलों. तर्पण ३०-३५ इसमांस सांगितलें. मी एक रुपया दिला, पंडा खूष होऊन यात्रा-सफलतेचा आशीर्वाद देऊन गेला. मग पिंड गंगेंत विसर्जन करून आलों. ब्रम्हकपाल हा एक खडक अलकनंदेचे एका तीरावर आहे. येथें पिंडदान केल्यावर पुनः श्राद्ध-पिंडदान करावें लागत नाहीं, असें तर्पण सांगणारा पंडा सर्वांना ऐकूं येईल असें सांगतो. स्थळाचा केवळ महिमा एवढाच ! बाकी विधि-मंत्रोच्चार वगैरे मनांत आणलें, तर असलेली श्रद्धा नाहींशी होते. असो.

वर येऊन हवन करून घराकडे परत आलों. आज पंडा आम्हांस जेवण देणार होता. देवळांतला भात व कढी नांवाचा बाजारांतील पातळ पदार्थ, कांहीं गोड व तिखट पदार्थ, असें त्यानें दिलेलें जेवण पाण्याबरोबर जेवलों (दूध, तूप, ताक ठाऊक नाहीं.) व पुनः विश्रांती घेतली. थंड अन्न व थंड हवा यांनें जीव मेटाकुटीस आला. संध्याकाळीं देवळांत जाऊन बद्रिनाथाला भोग, आटका वगैरे-साठीं प्रत्येकीं पांच रुपये भरून पावती घेऊन आलों व खोलींत पावती दाखवून देवावरील वस्त्राचा तुकडा, गंध व फुलें असें घेऊन उद्यां बारा वाजतां ही पावती देऊन महाप्रसाद न्या, असें ऐकून घरीं आलों. आजच कंडीवाल्याचे मैली बारा आणेप्रमाणें ७७ मैलांचे सर्व पैसे देऊन कराराचा कागद फाडून टाकला. माझा टॉवेल त्याच्या मागणीप्रमाणें त्याला दिला. ते खूष झाले होते.

ता. ७ ला स्नानें वगैरे करून बाजारांत कस्तुरी, शिला-जित् वगैरे घेऊन परतलों व बारानंतर देवळांत गेलों. एकच्या सुमारास घंटा झाली व लोकांना प्रसाद मिळूं लागला. आम्ही बुवांच्याकडेहि आज प्रसाद आणून जेवणें आटोपलीं. घोडेवाले हेलपाटे करत होते. पंड्याची संभावना व फक्त आशीर्वाद

घेण्याकरितां तासभर मोडला. ( काम प्रत्यक्ष न करतां पैसे काढण्यासाठीं माळ हातांत बांधण्यापेक्षां अमूकअमुकासाठीं इतके रुपये, असें हे पंडे करतील, तर गरिबांचा त्रास वाचेल. ) येथेंही आमचेसाठीं बुवांचा वेळ मोडला. आम्हीं बुवांचाही निरोप घेऊन निघालों. मजल दरमजल करीत ता. ९ रोजीं रात्रीं आठ वाजतां चमोलीस पोहोंचलों. हिलाच लाल संगा म्हणतात. अगोदरच पाऊस झाला होता व पेट्रोलच्या दुर्मिळतेमुळें ४-८ दिवस लोक येथें राहून गेल्यामुळें धर्मशाळा अगर खासगी जागेंत जागा मिळाली नाहीं. मग एका धर्मशाळेंत चुलीचे दगड काढून तसल्या जागेंत पडलों.

ता. १० ला सकाळीं स्टँडवर गेलों, तर ४-४ दिवसांपूर्वींचे लोक चालले होते. निराश होऊन रुद्रप्रयागपर्यंत ( पायदळ ) चालत जावें असें ठरवून सहकारी यांना कंडी ठरवून चालूं लागलों. ८-८।। झाले होते. मैठाण चट्टीस येऊन भात-पिठलें बनविलें व जेवण करून पुनः चालूं लागलों. नंदप्रयाग येथें सांखळीचें गेट असून एजंटाकडे चौकशी करतां तिकिटें मिळण्याची शक्यता आहे, असें तो म्हणाला. संध्याकाळीं ६-३० वाजतां चार गाड्या आल्या, आमच्या तीन सीट भरल्या, कंडीवाला पैसे देऊन सोड-विला व रात्रीं आठ वाजतां कर्ण प्रयाग येथें पोहोंचलों. दोन्ही-कडून हजारों लोक वस्तीस आलेले. दुकानासमोरील रस्त्यावर पडण्यासाठींसुद्धा भाडें द्यावें व दुकानांत व्यापार करावा, अशी कशी तरी जागा मिळविली व पडलों. ता. ११ ला सकाळीं नऊ वाजतां नांवें नोंदविलीं व स्नानें-फराळ आटोपून ११।। चे सुमारास पुढील अप्पर क्लासचीं तिकिटें घेऊन दीनदयाळ आल्याबरोबर आम्हीं मोटारींत जाऊन बसलों. तासाभरांत गौचर चट्टीस वडा-

खालीं मोटार सावलीस थांबली ( येथें पुढें विमानतळ होणार म्हणतात ) व पुढें रुद्रप्रयाग गांठलें. पुढें निघतांच एंजिन पेट्रोल खेंचत नव्हतें, असें दिसलें. सर्व खटपटी झाल्या. पेट्रोल संपून श्रीनगराचे अलीकडे डोंगरांत गाडी थांबली व सर्व पॅसेंजर १।। मैल चालत गेलों व कालीयासोप चट्टीवर रात्रींसुद्धा राहिलों. येथें अलकनंदा वहात असूनसुद्धा चढ-उतारामुळें पाण्याचे हाल आहेत. शिवलिंग व देवीचीं देवळें अगदीं नदीकांठीं आहेत. जाऊन दर्शन घेतलें. वर पाऊस झाल्यानें नदीचें पाणी पांढरी माती कालविल्याप्रमाणें गढूळ दिसत होतें.

सकाळीं मोटार-ड्रायव्हर स्वत: जाऊन पेट्रोल घेऊन आला व ११–३० वाजतां गाडी निघाली. आम्हीं बारा वाजतां श्रीनगर येथें पोहोंचलों, गौड ब्राम्हण हॉटेलांत जेवण घेतलें. एक महिन्यानंतर आज पुन: दही मिळालें. विश्रांती घेऊन पायानें तिसरे प्रहरीं निघून ५–३० वाजतां कीर्तीनगरास पोहोंचलों. भाडें देऊन जागा मिळविली. येथें शहापूरचे एक सराफ श्री. जोशी व हुबळीचे श्री. तिवारी भेटले.तिवारी गौरीशंकरचे डब्यांतून आमचेबरोबर काशीयात्रेस होते. फराळ करून सगळे निजलों. आमचे हमालानें दोन रुपये जादा देऊन काळचा मार्गानें तिकिटें मिळविलीं व १३ ला सकाळीं आम्हीं पांचचे मोटारनें निघालों. देवप्रयाग येथें फराळ केला. हमालाचें गांव जवळच असल्यानें त्याला पैसे-खुशाली देऊन मोकळा केला व बारा वाजतां ऋषीकेश येथें आलों. गंगा-स्नान करून पंजाब धर्मशाळेंत भात-पिठलें करून खाल्लें व संध्याकाळीं मोटारनें हरिद्वारास निघालों. रेल्वेची सोय आहे, पण प्रत्येक स्टेशन मैल दीड मैल दूर. राधाकृष्ण-मंदिरांत रहावयाचें म्हणून तपास करून तेथें गेलों. 'विश्रांतीसाठीं २-३ दिवस राहणार आहों. शक्यतर एक खोली भाडें घेऊन द्या ' असें मालकिणबाईना सांगि-

तलें. खोली रिकामी नव्हती. मग एक कपाट व निजण्यास माडी-वर जागा नाममात्र भाडें देऊन मिळविली. ता. १५ रोजीं नेहमीं-प्रमाणें गंगास्नान, हॉटेलांत जेवण व विश्रांती घेऊन संध्याकाळीं ६ वाजतां रिक्षा करून स्टेशनवर आलों.मुंग्यांसारखीं माणसें येत-जात होतीं. तिसऱ्या वर्गाच्या तिकिटांसाठीं लागलेली रांक पाहून दिल्लीपर्यंतचीं इंटर क्लासचीं तिकिटें काढलीं. गाडी रात्रीं १० चे सुमारास निघाली. बसण्यास जेमतेम जागा मिळाली.

रात्रभर गाडींत बसून ता. १६ ला सकाळीं ५-५५ वाजतां दिल्लीस आलों. तपास करतां पंजाब-मेल ८-४० ला निघते, असें समजलें. रंगोपंत कल्याणवरूनच पुण्यास जाण्यासाठीं आग्रह धरून बसले. पाऊस सुरू होता. तिसऱ्या वर्गाच्या तिकिटांसाठीं तपास करून पुणें व कल्याणचीं दोन तिकिटें घेऊन २।९ नंबरचे प्लॅट-फॉर्म फिरफिरून ३०० मैलावरील प्रवासासाठीं असलेल्या डब्यांत बसलों व निजून-बसून झांशी, भोपाळ, भुसावळ, नाशीक, इगत-पुरीवरून ता. १७ रोजीं दुपारीं दोनचे सुमारास कल्याणला उत-रलों. पुण्याच्या मंडळीबरोबर नाईक पुण्याच्या गाडीकडे वळले व मी ठाण्याचें तिकिट काढून लोकल गाडीनें घरीं आलों. कोण-तीही मेल वा एक्स्प्रेस ठाण्यास थांबत नाहीं.

# जगन्नाथपुरी

मी जून महिन्यांत (१९५१) श्रीकेदारनाथ व बद्रिनारायण या यात्रा करून हरिद्वारास परतल्यापासून जगन्नाथपुरीला एकदां लगेंच जाऊन यावें म्हणून विचार करीत होतों व सहरणपूर ते हावरा या रस्त्यानें गेल्यास जवळचें, असें ठरवून होतों. परंतु योगायोग नव्हता.ठाण्यास परत आल्यानंतर जाणारे कोणी भेटतात काय, म्हणून चौकशी करीत होतों. शुक्रवार ता. २६-१०-५१ रोजीं सकाळीं १० चे सुमारास श्री. क्षीरसागर नांवाचे एक गृहस्थ ( यांनींही बऱ्याच यात्रा केल्याचें ऐकलें ) आले व ' पुरीला जाणारी सोबत आहे. तुम्हीं ताबडतोब निघूं शकाल का ? ' असें विचारूं लागले; कारण दिवाळी लगेच होती. ' मी जाणेचें नक्की केलें आहे ', असें मी म्हणालों. तेव्हां 'गांवांत दातार वकील व इतर ४–५ मंडळी निघणार आहेत, त्यांना आतांच भेटल्यास तिकिटें राखून (रिझर्व्ह) ठेवण्याची व्यवस्था ते करीत आहेत व उद्यां ते निघणार आहेत.' या त्यांच्या सांगण्याप्रमाणें मी लगेंच श्री. दातार वकील यांची गांठ घेतली व कलकत्त्यापर्यंतचें तिकीट काढून मेलमध्यें एक सीट राखून (रिझर्व्ह) ठेवण्यास सांगून आलों.

तां. २७ ऑक्टोबर १९५१ रोजीं दुपारीं २-३० वाजतां ठाण्याहून लोकलनें निघून मुंबई (व्हिक्टोरिया टर्मिनस्) स्टेशन–

वर आलों. ठाण्याच्या स्टेशनवर श्री. पेंडसे व घाटे ऊर्फ कुलकर्णी-बाई अशा दोघी पण निघाल्या व मुंबईच्या स्टेशनवर जोशीबाई अशीं एकंदर पांच माणसें (आम्ही रिझर्व्ह केलेल्या चार सीट्स् व जोशीबाईंचा रेल्वे पास होता) मुंबईहून संध्याकाळीं कलकत्ता मेल (५-५ वाजतां) व्हाया नागपूर निघालों. तिकिटें मुंबई ते हावरा (कलकत्ता) काढलीं होतीं. गाडी सुटेपर्यंत पॅसेंजर येत होते व गर्दी झालीच. इगतपुरी, नाशीक, इटारसी, पुलगांव, नागपूर वगैरे करीत विलासपूरवरून खरगपूरला आलों व पुरीला अगोदर जाणे-साठीं ता. २९ ला सकाळीं पांच वाजतां उतरलों.

तोंड-धुणीं, चहा वगैरे आटोपून असिस्टंट जनरल स्टेशन मास्तर यांची गांठ घेऊन आम्हांस ३-४ दिवस जर्नी ब्रेक कर-ण्याची हेड् तिकिट कलेक्टरकडून नोंद करून घेतली व खरगपूर ते जगन्नाथपुरीचीं तिकिटें काढलीं. ही गाडी असनसोलमार्गें ८-५० वाजतां निघाली व रात्रीं ९-३० वाजतां पुरी स्टेशनला पोहोंचली. वाटेंत आम्हांस बरीचशी झोंप काढतां आली. संध्याकाळीं जरा दाटी झाली. पंडे लोक खरगपूर स्टेशनपासून जिल्हा विचारीत होतेच. गाडींत एक पुरीचा विद्यानंद नांवाचा मनुष्य भेटला, त्याचेकडून शक्य ती माहिती दातार वकील काढीत होते. रिक्शा वगैरे ठरवून २-३ मैल असलेल्या गांवांत आम्हीं धनजी मूळजी नांवाच्या भाटिया धर्मशाळेंत गेलों. तेथें एका खोलींत आम्हांस उतरवून एका मराठी जाणणाऱ्या पंड्याची ‡ गांठ घालून देऊन विद्यानंद आपल्या घरीं गेले. हात-पाय धुऊन आम्ही श्रीजगन्नाथाचे दर्शनार्थ देवळांत गेलों. एका दरवाज्याच्या भोकांतून साधारण

‡ वांछा पटनायक पंडा, गोपिनाथ भवन, पाणी टाकीजवळ, काणापुरिया गल्ली, मु. पुरी.

दर्शन घेऊन धर्मशाळेंत आलों व श्रीचा प्रसाद पंड्यानें आणलेला (भात व वरण) खाऊन निजलों. (तीन दिवसपर्यंत यात्रेकरूंना प्रसाद फुकट मिळतो व धर्मशाळेंतसुद्धा तीन दिवस जागेला भाडें नसतें).

ता. ३० ला सकाळीं नित्यक्रम संपवून आम्हीं समुद्र-स्नानास निघालों. वाटेंत साधारण पावसाला सुरवात झाली. फुलें, नारळ वगैरे घेऊन एका लहानशा देवळांत गेलों. तेथें तीर्थ-विधी, संकल्प सांगणारा पंडा होता. त्यानें तेथेंच कपडे वगैरे ठेवून संकल्प सांगितला व दिवाळीच्या अमावास्येचे भर पावसांत आम्हीं समुद्र-स्नान करून व येतांना शक्यतों देवांचीं दर्शनें करीत परत आलों. दीड-दोन मैल जातांना व तितकेंच परत येतांना फिरणें झालें. सर्वत्र भिकारी फार त्रास देतात. गांवांत आल्यावर सिंह दरवाज्यानें श्रीजगन्नाथाचे दर्शनाला गेलों. छत्री, जोडा वगैरे देवळांत न नेतां पोलीस शिपायापाशी काढून ठेवून आंत जावयाचें. अस्पृश्यांना बाहेरूनच दर्शन व्हावें, म्हणून पतितपावन जगन्नाथाची मूर्ती एका कट्ट्यावर कायम ठेवलेली दिसली. मुख्य देऊळ उंच जागेवर असल्यानें पायऱ्या चढून जावें लागतें. प्राकार बराच मोठा आहे. काशी विश्वनाथाच्या लहान लिंगाचें दर्शन करून आंत कल्पवृक्ष (वट) व इतर देवांचीं दर्शनें करून गरुड स्तंभ असलेल्या मुख्य सभामंडपांत गेलों.

देवळांत वरील बाजूस चित्रें आहेत. त्यांत सगळ्या गोपींनीं आपल्या शरिरांचा रथ केला असून त्यांत श्रीकृष्ण बसला आहे असें एक पूर्वीं न पाहिलेलें चित्र मी पाहिलें. जगन्नाथाचे देवळावर कळसाचे ऐवजीं चक्र आहे. श्रीचें दर्शन करून नंतर लक्ष्मी मंदिरा-कडे जाऊन देवाला भोग चढविण्याचें ठरवून व पैसे देऊन भोजन

करून वामकुक्षी केली. दुपारीं प्रसाद कुंकु वगैरे किरकोळ बाजार करून वेळ काढला व धर्मशाळेच्या मॅनेजरच्या ऑफिसांत लक्ष्मी-पूजनाला गेलों. रात्रीं ८ वाजणेच्या सुमारास जेवण ( प्रसाद ) करून सकाळीं निघण्याच्या विचारानें कांहीं भांडीं, कापड वगैरे खरेदी करून घरीं आलों. नंतर देवाचें दर्शन अगदीं जवळ जाऊन घडल्यास घेणेचें ठरलें. त्या खटपटींत रात्रीं १२ पर्यंत देवळांत जाऊन बसून राहिलों. देव-दर्शनासाठीं मारपीट सुरू होती. त्यामुळें आमच्या पंड्यासह आम्हीं निराशेनें वाटेनें फटाके व दिवाळीची रोषनाई पहात मग घरीं परत आलों व निजलों.

ता. ३१ ला सकाळींच स्नानें वगैरे आटोपून श्रीचे दर्शनाचा पुन: प्रयत्न झाला व प्रत्येकीं दहा आणे देऊन देवाच्या स्नानाच्या वेळेस दर्शन झालें. ( आरशासारख्या पितळी अगर सुवर्णाच्या ताटावर मूर्तींचें प्रतिबिंब पाडून त्यालाच स्नान समर्पण करतात). दर्शन झाल्यावर रिक्शा करून बेडी मारुती, इंद्रद्युम्न तलाव, जनकपूर (येथेंच प्रथम लाकडी मूर्ती बनविल्या गेल्या- जनन झालेली जागा), चक्रतीर्थ व चंदन तलाव पाहून आलों. श्रीकृष्णांनीं अवतार-समाप्ती केल्यावर कलेवर पश्चिम समुद्रांतून पूर्व समुद्रांत वाहून आलें व बेडी मारुतीपाशी किनाऱ्याला लागलें, अशी आख्यायिका येथें सांगतात. धर्मशाळेला परत येईपर्यंत पाऊस होताच. पंड्यानें प्रसाद आणला व वरण पातळ करून आम्हीं जेवणें उरकलीं व सामान आवरून भुवनेश्वरास जाण्यासाठी ३ रिक्शे करून निघालों.

बन्सीलाल पंड्या आमचेबरोबर होताच. गर्दी फार त्यामुळें तिकिटें मिळणें कठीण दिसलें. अखेर इंटर क्लासचीं तिकिटें काढलीं व सुमारें सात वाजतां पुरी स्टेशनहून निघालों. ७–८

स्टेशनानंतर भुवनेश्वर येथें रात्रीं १० चे सुमारास पोहोंचलों. (पुरीला जाण्यापूर्वी श्रीजगन्नाथ तपस्वी श्रीमहादेवासाठीं येथें राहिले असेंही म्हणतात). स्टेशनवरून बस्नें गांवांत येऊन दूधवाला यांच्या धर्मशाळेंत माडोवर रात्रीं राहिलों व फराळ करून झोंपलों.

## भुवनेश्वर

ता. २-११-५१ ला सकाळीं स्नानें वगैरे आटोपून खंडगिरी, उदयगिरी अशीं कांहीं स्थळें मोटारनें पाहून आलों. लेणीं व जैन-मंदिर किरकोळ आहे. भुवनेश्वर हें आतां ओरिसाचें नवें राज-धानीचें ठिकाण व्हावयाचें असल्यानें नवनव्या इमारती व रस्ते वगैरे सुरू आहेत. नवें मार्केट, विमानतळाची जागा वगैरे पहात पहात अखेर भुवनेश्वराचे देवळांत आलों.

श्री हरिहर अथवा भुवनेश्वराचें देऊळ चांगलेंच मोठें असून त्यांतच इतर लहान देवळें आहेत. श्री गणपतीची मूर्ती चांगली आहे. त्याचप्रमाणें श्री हरिहराचें भव्य लिंग पाहून मला फार बरें वाटलें. दर्शन घेतांना रुद्राच्या नमकाचा भाग कानांत पडला म्हणून त्रिलोचन भटजी (भारद्वाज गोत्री) यांना मी माझा एक अभिषेक करण्यास सांगून पैसे दिले व आवर्तन तरी करावें, अशा समा-धानानें परतलों. लिंगाच्या पिंडीमधला काळा भाग हरी व पांढरा हर असें मानलें जातें. असो. परत येऊन कलकत्त्याची गाडी पकडा-वयाची, म्हणून सामानासह मोटारीनें बिंदु तलावाजवळ गेलों. मार्जन करून मोटार गाडींत बसलों, तेथेंही ब्राम्हण वगैरे पैशा-साठीं त्रास देऊं लागलेच !

क्षेत्रांमधील या त्रासामुळें धर्मभावनाच नष्ट होण्याची पाळी येते. इकडची जमीन तांबडी, भाताचें पीक व एकंदरींत हवा वगैरे सर्व बेळगांवची आठवण देत. फक्त भाषा वेगळी. मोटारींत आमचे

शिवाय दुसरे पॅसेंजर बराच वेळ न आल्यानें आम्ही पुन: रिक्शे करून एकदांचे स्टेशनवर आलों व खरगपूरचीं रेल्वे तिकिटें काढलीं व रात्रीं खरगपूरला आलों. तेथें जोशीबाईंसाठीं कलकत्त्याचें तिकिट घेतलें व त्याच गाडीनें कलकत्त्याचा (हावरा) प्रवास सुरू केला.

## कलकत्ता

ता. २-११-५१ ला पहाटे ४-३० वाजतां हावऱ्यास उतरलों व लगेंच एक भाड्याची टॅक्सी ठरविली व बेलताला रोड नं. ८५।१।१ येथें आलों. कांहीं वेळानें महाराष्ट्र–निवासाचा दरवाजा उघडला व आम्ही माडीवर सामानासुद्धा गेलों, तोंपर्यंत चांगलें दिसूं लागलें. सुमारें सात वाजतां चहाचा ट्रे आला. आम्ही सर्वांनीं चहा घेऊन स्नानेंही कोणी कोणी केलीं. महाराष्ट्र-निवासाची इमारत चांगली असून सर्व सोयी ठीक दिसल्या. श्री. पटवर्धन नांवाचे मॅनेजर सुमारें ८-३० वाजतां आले ( कायमचे मॅनेजर श्री. गाडगीळ नांवाचे मुंबईस गेले, त्यांना ते डमडम विमानतळावर पोहोंचविण्यास गेले होते). श्री. दातार वकिलांनीं लगेंच भेटून आमच्याकरितां खोली मागितली व ४-५ दिवस राहणार आहोंत, असें सांगितलें. आम्हास एक खोली मिळाली, पण तिला रंगसफेती चालली होती.

चहासाठीं श्री. गाडगीळ नांवाचे एक गृहस्थ ( हल्लीचे Indian I. C. S.) तेथें आले. त्यांचे कुटुंब श्रीमती अन्नपूर्णाबाई पेंडसे यांच्या शिष्य-वर्गापैकी निघाल्या. कांहीं वेळानें आम्ही सर्व कालीमातेच्या दर्शनाला निघालों. गाडगीळबाईंनीं मार्गदर्शन केलें. ऊन चांगलेंच लागलें, पण देऊळ जवळच असल्यानें चालत गेलों. फुलें वगैरे साहित्य मिळतें. पूजा बांधलेली मूर्ती लहानशा गाभाऱ्यांत

वाजतां मेमोरियल बंद होतें, म्हणून श्रीपारसनाथाचें जैन–मंदिर पाहणेस निघालों व बस्‌मधून चढउतर करीत पांच साडे पांचचे सुमारास मंदिरांत पोहोंचलों. सर्वच अनोळखी व विचारविचारून आम्हांस समजण्याजोगें उत्तर देणारे क्वचितच भेटतात. त्यामुळें फार त्रास होतो. येथील ट्रॅम् व बस्‌मध्यें कल्पनातीत पॅसेंजर घेतात. त्यामुळें उतरण्याचें ठिकाणसुद्धा पुनः पुनः विचारावें लागतें. इकडे संध्याकाळ लवकर, त्यामुळें पर ठिकाण असल्यानें दिवे लागण्यापूर्वीं घरीं परतावयास पाहिजे होतें, पण तें जमलें मात्र नाहीं. मंदिरांत गेलों, तोंच दिवे लागले. हें देऊळ सर्व ठिकाणीं ( दरवाजे, खिडक्या, जमीन, खांब व वरील छत ) रंगीबेरंगी कांचेचे, चिनी मातीचे अगर दगडी तुकडे यांनीं काढलेल्या नक्षीकामानें सुशोभित केलें आहे. कलाकृतीचा हिंदुस्थानी उत्कृष्ट नमुना येथें पहावयास मिळतो. पाण्याचे तलाव व बाग, सर्वच संध्याकाळीं आनंददायक दिसलीं. शक्यतों भराभर पाहून आम्हीं परत बस् गांठली.

थोड्याच वेळांत दोन गाड्यांमध्यें एक मनुष्य सांपडला व आमच्या गाडीचा संबंध म्हणून अर्धा-पाऊण तास रेल्वे इस्पितळाजवळ सगळ्याच लोकांना तिष्ठत बसावें लागलें. सुदैवानें मनुष्य फारसा जखमी झाला नव्हता. अखेर कलकत्ता जनरल पोस्टावरून आम्ही कालीघाटाजवळ उतरलों व पुनः रखडत रखडत, विचारीत असे एकदां निवासांत आलों. भोजनोत्तर ता. ४-११-५१ रोजीं शांतिनिकेतन व गंगासागर अशीं पाहण्यास जाण्याबद्दल बऱ्याच खाटाघाटी झाल्या. कांहींच्या मतें या ठिकाणीं जाण्यांत विशेष अर्थ नसून व्यर्थ पैसा व वेळ गमवायचा. शाळा–कचेऱ्या तीन तारखेला सुरू झाल्याची जाणीव पण मंडळींना झाली. रविवार ता. ४ ला अखेर सकाळीं १०-३० ला जेवणें

आटोपून आम्ही व्हिक्टोरिया मेमोरियल् व नंतर बोटॅनिकल् गार्डन् पाहण्याचें ठरवून हाजरामूर स्टँडला आलों व बस्नें मेमोरियल गांठलें. छत्र्या वगैरे रखवालीस देऊन चार चार आण्यांचीं तिकिटें घेऊन आंत शिरलों.

## व्हिक्टोरिया मेमोरियल

कर्झन साहेबानें आग्र्याच्या ताजमहलला प्रतिस्पर्धी म्हणून ही इमारत बांधली. मधला घुमट, पाण्याचे तलाव व ऐसपैस पटांगणें, असा बाहेरील देखावा आहे. हिला संगमरवर वापरला असून जागजागीं राणीसह पुष्कळांचे पुतळे आहेत. आंत राणीचा पुतळा व इतर कांहीं जनरल्स्, क्लाईव्ह, फोर्ट विलियम्, ब्लॅक होल वगैरे चित्रें, नाना तऱ्हेचीं जुनीं हस्त–लिखितें, निरनिराळे नकाशे, असे ठिकठिकाणीं ठेविलेले आहेत. अगदीं मध्यावर घुमटांत (Art Gallery) भिंतीवर राणीचीं निरनिराळ्या प्रसंगांचीं रंगीत चित्रें आहेत. हें सर्व इंग्रजी सत्तेचें चिन्ह भारताच्या पैशांनींच बांधलेलें पाहून, बडोद्याच्या मंडळींना म्यूझियम् पहावयाचें म्हणून तेथें गेलों व सुमारें अडीच वाजतां पुनः बस्नें हावरा ब्रिजला आलों व पुनः B. E. College कडे जाणाऱ्या बस्नें बोटॅनिकल गार्डन्च्या द्वारीं आलों. संध्याकाळ होत आली असल्यानें सर्व बाग हिंडून पाहणें अशक्य, म्हणून एक पुरातन वटवृक्ष आहे, तो पाहण्यास गेलों. सुमारें दीड-एक मैल गेल्यावर एका वाटोळ्या हिरव्यागार मंडपांत शिरलों. हेंच तें १८१ वर्षांचें जुनें झाड ! त्याचा घेर ११७५ फूट आहे. जागजागीं पारंब्या सरळ जमिनींत शिरल्या गेल्यामुळें हा घेर वाढला आहे. असे वाढलेल्या घेराचे ८५१ बुंधे आहेत. या झाडाची उंची पूर्वी ८२ फूट होती, असें म्हणतात. मुख्य बुंधा कुजल्यामुळें काढून टाकला आहे आतां हा फक्त ५॥ फूट आहे. (ही माहिती इंग्रजींत लिहून लाविली आहे.)

हें सर्व पाहून आम्ही परतीच्या बसेस् गांठल्या व हावऱ्यावरून पुन: हाजरामूरवरून निवासांत परत आलों. श्री. वाघुलकर आडनांवाचे ठाण्याचेच (येथें डालडा वर्क्समध्यें असतात.) गृहस्थ आपल्या पत्नीसह श्री. दातार यांना भेटण्यासाठीं आले होते. (त्यांच्या वडिलांचा व दातारांचा स्नेह.) बोलतां बोलतां सौ. वाघुलकर यांना पण शांतिनिकेतन पाहण्याचें असल्याचें समजल्यानें ता. ५ रोजीं सकाळीं तेथें जाण्याचें ठरलें. पहाटे ४ वाजतां उठून प्रातर्विधी, स्नानें, धुणें आटोपून चहा घेतला व हाजरामूर स्टँडवर बस्मध्यें बसून हावरा स्टेशन गांठलें व बोलपूर स्टेशनचीं रेल्वेचीं तिकिटें घेतलीं व नं. ३ च्या फलाटावर आलों व गाडींत बसलों. सुमारें ७-४८ वाजतां गाडी सुटली व ११ चे सुमारास बोलपूर स्टेशनवर उतरलों व रिक्शा करून अर्ध्या पाऊण तासांत टागोर्जींच्या शांतिनिकेतनांत आलों.

एका शांत अशा राईंत १०-१५ इमारती, निरनिराळे लहान मोठे वृक्ष (आवळा, अंबा, फणस, ताल) व मुद्दामच कदाचित् राखलेली हिरवळ, असा देखावा दिसला. कांहीं ठिकाणीं रस्त्यावर मंडपवजा मुद्दाम गुंफलेल्या वेली वगैरेंनीं सावली केलेली दिसली. येणारे पाहुणे यांची पूसतपास करणारे मॅनेजर असलेल्या इमारतीजवळ आम्हीं उतरलों. रस्त्याच्या कमानीवर "आनंदरूप आश्रम" अशीं पत्र्याचीं अक्षरें आहेत. पुढें जाऊन मॅनेजरना 'आम्हीं पाहण्यास आलों आहों व परत दुपारचे गाडीनें जाणार आहोंत' असें सांगितलें. त्यावर 'अगोदर पत्रव्यवहार करून आमचें उत्तर घेऊन नंतरच लोकांनीं यावें. जेवण्या-राहण्याची सोय व दाखवण्यासाठीं माणसें, हें आयत्या वेळीं कसें जमणार?' वगैरे व्याख्यान त्यांनीं ऐकविलें. दातार वकिलींत पांढरे झालेले. त्यांनीं इकडीलतिकडील गप्पा करीत माहिती काढून आमची जेवणा-

राहण्याची फिकीर न करतां एक वाटाड्या मिळविला. त्याचे-बरोबर आम्ही लायब्ररी, रीडिंग रूम हॉल, कांहीं कलावशेष वगैरे व निसर्ग-शोभा पाहून आलों. खरें कला-भुवन (बेसिक काम व स्टोअर) तेथून २-३ मैलांवर आहे. पण हिवाळ्याच्या सुट्टी-निमित्त शाळा बंद होत्या. केवळ शिक्षण म्हणजे पुस्तकी विद्या व घोकंपट्टी असें येथें नसून विद्यार्थी-वर्गानें आपला धर्म, कर्तव्य, समाजासंबंधीं जाणीव, आरोग्य हीं सर्व तत्त्वें शिकून स्वावलंबी व्हावें, असें ध्येय आहे. प्रायमरीपासून एम्. ए. पर्यंत शिक्षण दिलें जातें. ड्रॉइंग, पेंटिंग, वीव्हींग वगैरे वगैरे. पुष्कळ वेळां वर्ग झाडाखालींच घेतात. मध्यें गुरुजी व भोंवती चंद्राकार कट्ट्यावर मुलांनीं बसावयाचें. अभ्यास घरीं अगर बोर्डिंगांत करावयाचा नाहीं. तो शाळेंतच सर्व करवून घेतात. विद्वान् शिक्षक-वर्ग मुद्दाम कांहीं वेळां दूरदुरून आणवितात. एक डॉक्टर असतो व आरोग्या-कडे तो लक्ष पुरवितो. ६ वर्षें वयापासूनचीं मुलें ठेऊन घेतात. कांहीं वेळां सहशिक्षण देतात. पण इकडील रिवाजाप्रमाणें स्त्रिया व पुरुषांचे सर्व स्वतंत्र असतें. विवाह झालेली स्त्री इकडे भांगांत कुंकू (शेंदूर) घालते. आमच्या बायका जसें मंगळसूत्र जपतात, तसेंच हें शेंदूर-प्रकरण असल्याचें ऐकलें.

विद्यार्थ्यांची प्रवृत्ति कोणीकडे आहे, हें पाहून त्याच विष-यांत प्राविण्य संपादन करून घेण्याची तयारी करवितात व शक्य-तों चांगला नागरिक त्याला बनविण्याचा प्रयत्न केला जातो. मुलां-मुलींकरितां स्वतंत्र बोर्डिंगांची व्यवस्था केलेली असल्याचें समजलें. सुमारें एक वाजतां गेस्ट हाऊसला परतलों. एके ठिकाणीं जयप्रभा बेन (बडोद्याच्या बायकांपैकीं बी. ए. मास्तरीण) यांनीं आमचेसह सगळ्यांचा ग्रूप फोटो घेतला. आमचे सगळ्यांचे फराळ आटोपले व निघण्याचा विचार सुरू झाला. श्री. दातारांची

C/१४०



कांहीं पुस्तकें, पत्रव्यवहार वगैरे असलेली एक हात–पिशवी हरवल्याचें आढळून आलें. हुडकण्याचे प्रयत्न निष्फळ झाले व आम्हीं ३-३० वाजतां पुनः रिक्शा करून स्टेशनवर आलों.

कलकत्त्याकडे जाणारी गाडी ४-२६ ला होती. तिकिटें घेऊन इकडेतिकडे करीत वेळ काढला. बडोद्याची मंडळी हावर स्टेशनवरून परभारेंच जगन्नाथपुरीला जावयाची होती, म्हणून त्यांचीं पुरीचीं स्वतंत्र तिकिटें काढविलीं. बरद्वान वगैरे स्टेशनें घेत रात्रीं १० चे सुमारास हावरा स्टेशनवर उतरलों. पुरीला जाणारी मंडळी परभारेंच गाडीनें गेली. श्री. वाघुलकर स्टेशनवर आले होते, ते कुटुंबासह परभारेंच गेले व आम्हीं घरीं (निवासांत) परतलों व ठेवलेलीं ताटें घेऊन जेवण करून झोंपीं गेलों. गंगासागर पाहणेचा बेत सर्वानुमतें रहित केला व संध्याकाळीं मुंबई मेलनें परत ठाण्यास जाण्याचें ठरविलें. स्नानें करून पुनः एकदां श्रीकालीमातेचें दर्शन, प्रसाद वगैरे घेऊन घरीं परतलों. दुपारीं जेवणें करून गांवांतील तिकिट-ऑफिसांतून कल्याणचीं तिकिटें आणलीं. चहा-जेवणानंतर निवास सोडला व टॅक्सीनें हावरा स्टेशनवर आलों. हावऱ्याचा पूल (सस्पेन्शन् ब्रिज्) हासुद्धा प्रेक्षणीय आहे. मोटारी, ट्रॅम्, खटारे व पायदळ अशी सर्व प्रकारची रहदारी नेहमीं पुलावरून सुरू असते.

मुंबईची मेल १० नंबरच्या प्लॅटफॉर्मवरून संध्याकाळीं ८–३० ला निघाली. बघतां बघतां गर्दी झालीच. त्यांतूनच आडवे उभे करीत ता. ८-११-५१ ला सकाळीं दहाचे सुमारास कल्याणहून लोकल गाडीनें श्री. दातार व मी परत ठाण्यास आलों.

समाप्त

REFBK-0008140
REFBK-0008140